सहकार्यम् यशोधनम्
स्थापना – १९४९

गरुड झेप

www.janatabankpune.com

सन २०१५ – अंक ५ वा (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

अध्यक्षांचे लेखणीतून,

माध्यमिक शाळेत असताना वर्गात एक 'मॉनिटर' नेमलेला असे. गडबड करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे फळ्यावर लिहिणे, शिक्षकांना त्यांच्या कामात मदत करणे, वर्ग नीटनेटका राहील, शिस्त पाळली जाईल याकडे लक्ष देणे वगैरे जबाबदाऱ्या त्याच्याकडे असत. मॉनिटरिंग या इंग्रजी शब्दाचा अर्थ कळण्यापूर्वी ही मॉनिटरिंगची कामे करावी लागत होती. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बँकेत 'मॉनिटरिंग विभाग' या नावाचा एक विभाग आहे. मोठ्या कर्ज खात्यांवर लक्ष ठेवणे व ही खाती अनुत्पादक होण्यापासून रोखण्यासाठी वेळीच कार्यवाही करणे असे त्यांच्या कामाचे सध्याचे स्वरूप आहे. मोठे खाते म्हणजे काय पन्नास लाख/१ कोटी/३ कोटी/५ कोटी चे खाते अशी मर्यादित स्वरूपाची व्याख्या केल्यास लहान शाखांकडे अशी खाती कमी असतात वा नसतात. मग तेथे मॉनिटरिंगची आवश्यकता नाही काय असे कोणी विचारेल. मोठ्या रकमेच्या कर्ज खात्यावर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक असलेली जाण/माहिती/अनुभव प्रत्येकाजवळ नसतो व अशा खात्यांद्वारे बँकेवर होणारा परिणाम विविध पैलूंनी युक्त व खोलवर परिणाम करणारा असतो. सबब हे काम केंद्रीय कार्यालयामार्फत आपण करतो. यात शाखांचा सहभागही तेवढाच महत्त्वाचा असतो. शाखेतील सेवक हे बँकेचे डोळे व कान असतात. त्यांच्याद्वारेच व्यवस्थापनास आवश्यक ती माहिती मिळत असते. मॉनिटरिंग हे फक्त मोठ्या खात्यांचेच करावयाचे का? लहान खाती दुर्लक्षित ठेवून चालेल का? लहान खात्यांचे व ज्या खात्यांचे मॉनिटरिंग मुख्य कार्यालयामार्फत डायरेक्टली केले जात नाही अशा सर्व खात्यांचे मॉनिटरिंग शाखांनी करावयाचे हे उघड आहे. साहजिकच या दृष्टीने शाखांची जबाबदारी ही जास्त मोठी व जास्त जिकीरीची आहे हे निश्चित. त्यासाठी सुद्धा जाण/माहिती/अनुभव यांची आवश्यकता आहेच. बँकेच्या व्यवसायातील कामांपैकी कर्ज देणे व पर्यायाने नंतर कर्ज वसुली करणे हे एक मुख्य काम असते. लहान कर्जे सुद्धा वसूल झालीच पाहिजेत हेही आवश्यकच आहे. त्यासाठी अशा कर्ज खात्यांवरही बारीक लक्ष ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यातील हप्ते व व्याज वेळेत भरले जाते किंवा नाही यावर लक्ष ठेवणे व सदर रकमा न भरल्या गेल्यास या कर्जदारांशी प्रत्यक्ष व पत्राद्वारे सतत संपर्कात राहणे हे गरजेचे असते. त्यासाठी कर्जदाराचा अन्य व्यवसाय आपल्या बँकेकडे वळविणे हा चांगला उपाय आहे. त्याचे सेव्हिंग्ज खाते, लॉकर, घर कर्ज, शैक्षणिक कर्ज, पगाराचे खाते, डिमॅट खाते, आधार कार्ड नोंदविलेले खाते की ज्यात गॅस वगैरेचे सबसिडी जमा होते, त्याला इंटरनेट बँकिंग सुविधा देणे जेणेकरून खातेदार त्याची देयके आपल्या मार्फत देईल, बँकेचे भागधारक करून घेणे अशा एक ना विविध प्रकारे खातेदाराला जोडून ठेवले की आपोआपच तो आपल्या सतत संपर्कात राहील व त्याला संपर्क करण्यासाठी आपल्याला विशेष व वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत. आता आपण त्याच्या विमा पॉलिसीज उतरवू शकतो. विमा म्हणजे व्यक्तीचा, त्याच्या स्थावर/जंगम मालमत्तेचा तसेच आरोग्यविषयक विमा ही होय.

सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभही आपण खातेदाराला मिळवून देऊ शकतो.

➤ पान क्र. ६ वर ...

आपल्या बँकेच्या उदगीर शाखेचे भव्य उद्घाटन
बँकेची ४८ वी शाखा आणि एटीएम केंद्राचे उद्घाटन

उदगीर शाखेचे उद्घाटन विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक – अध्यक्ष अशोकराव कुकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष अरविंद खळदकर व उपाध्यक्ष संजय लेले, आमदार सुधाकर भालेराव, नगराध्यक्ष राजेश्वरजी निटुरे, व संचालक मंडळ सदस्य उपस्थित होते.

आपल्या बँकेच्या उदगीर शाखेचा शुभारंभ दि. १४ सप्टेंबर, २०१५ रोजी लातूरच्या विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक-अध्यक्ष मा. डॉ. अशोकराव तथा काका कुकडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याचवेळी या शाखेतील 'एटीएम' केंद्राचा शुभारंभ मा. आमदार सुधाकरराव भालेराव यांच्या हस्ते करण्यात आला. समारंभाचे अध्यक्षस्थानी उदगीरचे नगराध्यक्ष मा. राजेश्वरजी निटुरे उपस्थित होते. आपल्या बँकेची ही ४८ वी शाखा आहे. उद्घाटन समारंभाला उदगीर येथील नागरिक, ग्राहक, हितचिंतक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मा. माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.

उदगीर शाखेच्या उद्घाटनानंतर बोलताना डॉ. अशोकराव कुकडे म्हणाले, वैचारिक व सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देत जनता बँक गेली ६५ वर्षे सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत आहे. समाजासाठी आणि समाजाकरिता सतत कार्यरत असणाऱ्या या बँकेने पारदर्शकता आणि विश्वासार्हता जपली आहे. उदगीरमधील नागरिक व व्यावसायिकांनी जनता बँकेच्या अत्याधुनिक सेवासुविधांचा लाभ घ्यावा आणि बँकेशी आपले नाते निर्माण करावे.

अध्यक्ष अरविंद खळदकर म्हणाले की, छोट्या लोकांची मोठी बँक म्हणून नावलौकिक आहे. मराठवाड्यात लातूर, औरंगाबाद, अंबाजोगाई आणि आता उदगीर येथे बँकेच्या शाखा कार्यरत असून लवकरच मराठवाड्यातील जालना येथे बँकेची नवीन शाखा चालू होणार आहे. उदगीरमधील नागरिकांनी बँकेच्या सेवासुविधांचा लाभ घ्यावा.

जनता बँकेने उदगीरमध्ये आपली

➤ पान क्र. ३ वर ...

पुढील अंक '६ शाखांचा उद्घाटन समारंभ' विशेषांक स्वरुपात लवकरच प्रकाशित करीत आहोत.

अभिनंदन! व हार्दिक शुभेच्छा!

कंपनी सेक्रेटरी परीक्षेत ऋचा ढमढेरे यांचे सुयश

पुणे : जनता सहकारी बँकेच्या सहकारनगर शाखेच्या खातेदार कुमारी ऋचा मिलिंद ढमढेरे यांनी इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीजतर्फे जून २०१५ मध्ये घेतलेल्या कंपनी सेक्रेटरीज परीक्षेत प्रावीण्य मिळविले. त्यांनी एकाच वेळी या अंतिम परीक्षेचे सर्वच्या सर्व नऊ पेपर दिले व सर्व विषयात त्या उत्तीर्ण झाल्या. एकाच वेळी सर्व नऊ पेपर उत्तीर्ण होणे ही अतिशय दुर्मिळ कामगिरी मानली जाते. देशभरात आयोजित केलेल्या या परीक्षेचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण केवळ तीन टक्के आहे. ऋचा ढमढेरे यांनी सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून एप्रिल २०१४ मध्ये वाणिज्य शाखेच्या पदवी परीक्षेत विशेष प्रावीण्यासह प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे.

श्री. मिलिंद ढमढेरे यांना भाऊसाहेब झंवर पुरस्कार

पुणे : जनता सहकारी बँकेच्या सहकारनगर शाखेचे खातेदार श्री. मिलिंद प्रभाकर ढमढेरे यांना ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक बी. पी. तथा भाऊसाहेब झंवर स्मृती क्रीडा महारथी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. झंवर परिवारातर्फे दरवर्षी क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान दिला जातो.

खातेदार संगीता दामले यांची गौरवास्पद कामगिरी

चिंचवडगाव शाखेतील सन्माननीय खातेदार सौ. संगीता संदिप दामले यांनी २४ ते २७ जुलै २०१५ रोजी एशियन योगा – चॅम्पियनशिप २०१५ च्या स्पर्धेमध्ये वय ४१ ते ५० या वयोगटात भाग घेतला होता. ही स्पर्धा इंटरनॅशनल ॲम्युचर गेम्सच्या वतीने चंद्रकासेन राजाभट विश्व विद्यालय बँकॉक, थायलँड येथे संपन्न झाली होती. स्पर्धेमध्ये सौ. दामले यांनी भारतासाठी कांस्यपदक मिळविले आहे.

खातेदार आदिनाथ जगताप यांना गुणवंत पुरस्कार प्राप्त

आपल्या भोर शाखेतील खातेदार श्री. आदिनाथ बाजीराव जगताप यांना जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल बँकेतर्फे श्री. आदिनाथ जगताप यांचे हार्दिक अभिनंदन!

जिगरबाज अथर्वने टाळला अनर्थ

आपल्या सहकारनगर शाखेतील वरिष्ठ अधिकारी श्री. अभय पाठक यांचा सुपुत्र अथर्व यांच्या धाडसी व परिस्थितीवर मात करण्याच्या जिगरबाज स्वभावाचा प्रत्यय नुकताच आला.

लाल महालासमोरील एका इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील क्लिनिकला शनिवारी मध्यरात्री आग लागली. तिसऱ्या मजल्यावरील रहिवासी गच्चीवर पोहोचले. मात्र, दुसऱ्या

मजल्यावर राहणारे दत्तात्रय अंबादास वैद्य (वय ८०) आणि त्यांची पत्नी पार्वती (वय ७५) हे दोघे फ्लॅटमध्ये अडकून पडले होते. त्यांना काहीच हालचाल करणे शक्य नव्हते. वैद्य दाम्पत्याचा जवळच राहणारा मुलगा घटनेची माहिती मिळाल्यानंतर तेथे आला. पाठोपाठ अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. वैद्य यांच्या नातवाचा मित्र अथर्वही तेथे पोहोचला.

आग ओटक्यात आणण्यासाठी पाणी मारण्यास सुरुवात झाली; तसेच काही जवानांनी आग लागलेल्या क्लिनिकच्या मागील बाजूच्या खिडकीच्या काचा फोडल्या व तेथून पाण्याचा मारा सुरू केला. तेथून धुराचे लोट बाहेर पडू लागले. त्याच खिडकीच्या वरच्या बाजूस वैद्य दाम्पत्याच्या बेडरूमची खिडकी उघडी होती. तेथून त्यांच्या फ्लॅटमध्ये धूर जमा झाला. वैद्य यांच्या नातवाने जिन्याने वर जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, धुराचे प्रमाण खूप असल्याने त्याला वर जाता आले नाही. त्यामुळे इमारतीत थांबलेल्या वैद्य कुटुंबीयांनी अग्निशामक दलाच्या जवानांना त्यांच्या फ्लॅटच्या मुख्य रस्त्याच्या बाजूच्या खिडकीच्या काचा फोडण्याची विनंती केली. मात्र, जवानांची आग आटोक्यात आणण्यासाठी धावपळ सुरू होती. मग अथर्व अग्निशामक दलाची शिडी घेऊन वर गेला आणि त्याने दगडाने काचा फोडल्या.

अथर्व पाठक गरवारे कॉलेजमध्ये बीकॉमच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. खिडकीच्या काचा फोडताना त्याच्या दोन्ही हातांना जखमा झाल्या. चि. अथर्वचे सगळीकडे कौतुक होत आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव आपल्या कृतीतून व्यक्त करणारी ही तरुणाईची झलक निश्चितच कौतुकास्पद आहे.

सर्वांचे आपल्या बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!

➤ पान क्र. १ वरून...

आपल्या बँकेच्या उदगीर शाखेचे भव्य उद्घाटन
बँकेची ४८ वी शाखा आणि एटीएम केंद्राचे उद्घाटन

शाखा चालू केली त्याबद्दल सर्वप्रथम त्यांचे अभिनंदन करतो, असे सांगून आमदार सुधाकर भालेराव म्हणाले बँकेने या भागातील सुशिक्षीत बेरोजगारांना कर्जपुरवठा उपलब्ध करून द्यावा.

नगराध्यक्ष राजेश्वरजी निटुरे म्हणाले, चांगली बँक उदगीरमध्ये आली. जनता बँकेची उदगीरमध्ये भरभराट होईल. येथे व्यापार चांगला आहे. त्याचा फायदा बँकेला होईल. श्री. राधाकृष्ण लिमये यांनी समारंभाचे सूत्रसंचालन केले. नूतन शाखाधिकारी श्री. विवेक देशपांडे यांनी आभार मानले.

उदगीर शाखेच्या एटीएमचे उद्घाटन मा. आमदार सुधाकर भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अशोकराव कुकडे, नगराध्यक्ष राजेश्वरजी निटुरे, अध्यक्ष अरविंद खळदकर.

आपल्या बँकेचे कर्वेनगरला 'ऑफ साइट एटीएम'

आपल्या बँकेच्या कर्वेनगर येथील 'ऑफ साईट एटीएम' चे उद्घाटन उद्योजक आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष विश्वास देवल यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. संजय लेले, मा. संचालक श्री. कदम उपस्थित होते.

आपल्या बँकेने कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या आवारात 'ऑफ साइट एटीएम' उभारले आहे. याचा शुभारंभ दि. २६ सप्टेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध उद्योजक आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष विश्वास देवल यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर, मा. उपाध्यक्ष संजय लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी वसंतराव कुलकर्णी, संचालक मंडळ सदस्य व बँकेचे हितचिंतक आदी उपस्थित होते. देवल यांनी बँकेच्या आजपर्यंतच्या कामगिरीचे कौतुक केले. अध्यक्ष मा. खळदकर यांनी कर्वे संस्थेने 'ऑफ साइट एटीएम' साठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लातूर शाखेमध्ये व्याख्यानाचा कार्यक्रम

आपली लातूर शाखा ही गेली ४९ वर्षे लातूर शहरात अविरत आर्थिक सेवा देत असून सामाजिक बांधिलकी जपत व सर्वसामान्य जनमानसात ठसा उमटवीत ५०व्या वर्षात पदार्पण करत आहे. त्याचा अनुभव सर्व लातूरकर घेत आहेत. .

बँकेचे खातेदार, सभासद व हितचिंतक यांचा सहभाग व उत्साह लक्षात घेऊन इच्छापत्र या विषयावर मा. दादासाहेब बेंद्रे-ज्येष्ठ विधीज्ञ (पुणे बार असोसिएशन) यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले.

इच्छापत्राविषयी मा. अशोकराव कुकडे यांनी अध्यक्षीय भाषण केले. समाजात असलेले समज-गैरसमज याविषयी माहिती दिली.

मुख्य अतिथी व व्याख्याते मा. दादासाहेब बेंद्रे ज्येष्ठ विधीज्ञ पुणे बार असोसिएशन यांनी प्रामुख्याने इच्छापत्र म्हणजे काय? कोण करू शकतो? कसे करावे? मजकूर कायदेशीर भाषेत असावा का? मानवी मनातील इच्छा जी आहे त्याप्रमाणे भाषा इच्छापत्रात लिहिता येते का, या सर्व प्रश्नांची उकल सविस्तरपणे केली. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी व मान्यवर ॲड. संजय पांडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. पाठक, श्री. लातुरे अप्पा, श्री. तापडियाजी, श्री. अभिमान्यू रासुरे, श्री. अभय शहा, सौ. भार्गव भाभी व सर्व स्तरातील गणमान्य व्यक्ती व पत्रकार बंधूंसह ३४० पेक्षा जास्त श्रोतेउपस्थित होते.

आरोग्य विमा सेवेसाठी आपल्या बँकेचा रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीशी करार

रेलिगेअर हेल्थ इन्शुअरन्स कंपनीच्या आरोग्य विमा सुविधा आता आपल्या बँकेच्या सर्व खातेदारांना प्राप्त होणार आहेत. रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी आणि आपली बँक यांच्यात परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला असून बँकेला सदर कंपनीची कॉर्पोरेट एजन्सी यामुळे प्राप्त झाली आहे. या करारावर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी आणि रेलिगेअर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनुज गुलाटी व संचालक श्री. अजय शहा यांनी दि. २४/८/२०१५ रोजी पुणे येथे एका समारंभात स्वाक्षऱ्या केल्या.

या परस्पर सहकार्यामुळे रेलिगेअर कंपनीला आपली आरोग्य विमा सेवा-सुविधा बहुसंख्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी

➤ पान क्र. ४ वर ...

आरोग्य विमा सेवेसाठी रेलिगेअर इन्शुरन्स कंपनी आणि पुणे जनता सहकारी बँकेमध्ये झालेल्या कराराचेवेळी डावीकडून कंपनीचे संचालक श्री. अजय शहा, रेलिगेअर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनुज गुलाटी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत केतकर व माजी. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी.

शनिवार–नारायण पेठ शाखेचे खातेदार श्री. विनायक करमरकर यांना 'आदर्श पत्रकारितेचा' पुरस्कार प्राप्त

सहकारमंत्री मा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व पुण्याचे पालकमंत्री मा. गिरीश बापट यांच्या उपस्थित पुरस्कार स्वीकारताना श्री. करमरकर.

पुणे येथील दि पूना मर्चंट चेंबरच्या वतीने प्रतिवर्षी प्रदान केला जाणारा आदर्श पत्रकारितेचा पुरस्कार दैनिक लोकसत्ताचे बातमीदार व आपल्या शनिवार–नारायण पेठ शाखेचे खातेदार श्री. विनायक करमरकर यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. राज्याचे सहकारमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे जिल्हा पालकमंत्री गिरीश बापट, चेंबरचे अध्यक्ष प्रवीण चोरबेले, अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री करमरकर यांनी यावेळी पुरस्काराच्या रकमेत स्वतःचा निधी समाविष्ट करून पुरस्काराची रक्कम निवारा या संस्थेस समारंभपूर्वक प्रदान केली.

गेली १८ वर्षे श्री. करमरकर हे पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत त्यांनी दैनिक लोकसत्ताच्या माध्यमातून अभ्यासपूर्ण विपुल लेखन केले आहे. निशाचर हे त्याचे सदर विशेष लोकप्रिय ठरले होते. याखेरीज नागरी समस्यांना त्यांनी आपल्या लेखनातून वाचा फोडली आहे. तसेच पुणे महानगर पालिकेमधील अनेकविध घडामोडी निरपेक्षपणे त्यांनी वाचकासमोर मांडल्या आहेत. सडेतोड पण नेमकेपणा हे त्याच्या लेखनाचे वेगळेपण आहे. रां. स्व संघाचे स्वयंसेवक म्हणून ते कार्यरत आहेत. याआधी त्यांनी काही काळ प्रचारक म्हणून काम केले आहे.

पुणे सिंहगड रोड शाखेचे 'सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघ' यांच्या संयुक्त विद्यमाने 'इच्छापत्र व त्याचे व्यवस्थापन' कार्यक्रमाचे आयोजन

पुणे : 'सिंहगड रोड शाखा' व 'सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघ' यांच्या संयुक्त विद्यमाने सनसिटी सभागृहामध्ये 'इच्छापत्र व त्याचे व्यवस्थापन' हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. उजळंबकर, सनसिटी रहिवासी संघ अध्यक्षा सौ. जोगळेकर, Executer व Trustee विभागाचे प्रमुख श्री. अर्जुन वडतिले व सिंहगड रोड शाखाव्यवस्थापक श्री. धनंजय कानडे उपस्थित होते. या वेळी प्रमुख

पाहुणे म्हणून ज्येष्ठ विदिज्ञ श्री. दादासाहेब बेंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. उजळंबकरांनी सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघ व सनसिटी रहिवासी संघ याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

श्री. अर्जुन वडतिले यांनी Executer व Trustee विभागाचे कामकाज कसे चालते व त्याचा ज्येष्ठ नागरिकांना काय फायदा होईल याबद्दलची माहिती सांगितली.

श्री. दादासाहेब बेंद्रे यांनी इच्छापत्र बाबत मार्गदर्शन केले. इच्छापत्र कसे असावे, ते कोणी करावे, का करावे, कोणामार्फत करावे इ. मूलभूत बाबी स्पष्ट करून सांगितल्या. अत्यंत सोप्या व साध्या शब्दांत मार्गदर्शन केले.

आपल्या बँकेची ऑनलाइन फी संकलन सुविधा

पुणे : आपल्या बँकेने शाळा आणि महाविद्यालयांना 'ऑनलाइन फी' संकलनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी 'पे यू मनी' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीबरोबर सहकार्य करार केला आहे. या करारामुळे शाळा व महाविद्यालयांना विविध प्रकारच्या फी एका क्लिकवर भरणे सहज शक्य होणार आहे. या आधुनिक सुविधेचा फायदा शिक्षण संस्थांनी करून घ्यावा, असे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर यांनी येथे स्पष्ट केले आहे.

बँकेने शाळा आणि महाविद्यालयांना विविध प्रकारच्या फी ऑनलाइन पद्धतीने भरण्याचे फायदे समजून सांगण्यासाठी एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत पुण्यातील विविध शाळा/महाविद्यालयांचे प्रमुख उपस्थित होते. कार्यशाळेत श्री. खळदकर बोलत होते. संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत केतकर, 'पे यू मनी' या कंपनीचे उपाध्यक्ष अन्शुल लाल आदी उपस्थित होते.

श्री. खळदकर म्हणाले, शाळा, महाविद्यालयांना विविध प्रकारची फी गोळा करण्याचे काम सतत करावे लागते. हे काम तसे कटकटीचे असते. शिक्षण संस्थांचे हे महत्त्वाचे काम सहज सोपे व्हावे यासाठी बँकेने 'ऑनलाइन फी' संकल्पनाची आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याचा शिक्षणसंस्थांनी उपयोग करून घ्यावा. या सुविधेमुळे शिक्षणसंस्थांचे काम सुकर होणार आहे. डॉ. शिकारपूर म्हणाले, सध्या आपण माहिती तंत्रज्ञान युगात असून 'पेपर लेस ऑफिस'ची पुढची पायरी म्हणजे ई–पेमेंट. जनता बँकेने 'पे यू मनी'च्या माध्यमातून 'ऑनलाईन फी' संकलनाची सुविधा शिक्षणसंस्थांना उपलब्ध करून दिली आहे. हा एक स्तुत्य उपक्रम आहे त्याच्या शिक्षणसंस्थांनी फायदा करून घ्यावा.

आरोग्य विमा सेवेसाठी आपल्या बँकेचा रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीशी करार

➤ पान क्र. ३ वरून ...

बँकेच्या बहुविस्तारित कार्यक्षेत्राचे पाठबळ मिळणार आहे.

या प्रसंगी माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी म्हणाले की, आज आरोग्य विमा हा आपल्या आजीव आर्थिक नियोजनामधील अविभाज्य घटक आहे. बँकेच्या सभासद–ग्राहकांना जास्तीत जास्त दर्जेदार सेवा देण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आम्ही हा करार केला, याचा आम्हास अतिशय आनंद वाटतो. रेलिगेअर इन्शुरन्सचे श्री. अनुज गुलाटी म्हणाले की, ६६ वर्षांचा प्रगतिशील सामाजिक वारसा असलेल्या जनता सहकारी बँकेशी झालेल्या या साहचर्याबद्दल आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. जनता सहकारी बँक महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर वेगाने प्रगती करीत आहे. म्हणूनच ग्राहकांना आरोग्य सेवांचा दर्जेदार पर्याय देण्यासाठी उभयता कटिबद्ध आहेत.

आनंदोत्सवात पार पडलेला गणेशोत्सव २०१५

सालाबादप्रमाणे यंदाही आपल्या बँकेचा गणेशोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला. सदर वर्ष हे गणेशोत्सव मंडळाचे सिल्व्हर जुबली वर्ष होते. गणरायाचे आगमन झाल्यापासून विसर्जन मिरवणुकीपर्यंत सर्व सेवकांनी यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

गणेशोत्सवामध्ये महिला सेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. गणेशोत्सवा निमित्त महिलांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मेहंदी स्पर्धा व Food Without Fire या दोन स्पर्धा घेण्यात आल्या.

मेहंदी स्पर्धे मध्ये १) प्रीती म्हसकर- टिळक रोड शाखा, २) प्रणिता दामले-बाजीराव रोड शाखा व ३) सौ. प्रज्ञा केळकर - पौड रोड शाखा यांचे तर Food Without Fire मध्ये १) सौ. अनुराधा जोगदेव मुख्यकचेरी कर्ज विभाग, २) सौ. पूर्वा मराठे- बाजीराव रोड शाखा, ३) सौ. सुप्रिया शेठ -एफ.सी.रोड शाखा यांना पारितोषिके आपल्या बँकेच्या संचालिका सौ. कसबेकर मॅडम यांच्या हस्ते देण्यात आली.

गृहनिर्माण सहकारी संस्थांचा मेळावा संपन्न

पुणे जिल्हा सहकारी महासंघ व कर्वे नगर शाखा यांच्या संयुक्त प्रयत्नाने कर्वेनगर व कोथरूड परिसरातील गृहनिर्माण संस्थांचा मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास सहकारी संस्था मार्केटयार्ड उपनिबंधक पुणे शहर क्र. १ चे मा. मगर, मा. पांढरे तसेच महासंघाचे पदाधिकारी व बँकेचे सहमहाव्यवस्थापक मा. डी. जी. कुलकर्णी व उपमहाव्यवस्थापक मा. आपटे उपस्थित होते.

बँकेच्या कर्वेनगर शाखेत सध्या अंदाजे १२५ गृहनिर्माण संस्थांची बचत ठेव खाती आहेत. शाखेने व महासंघाने सदर कार्यक्रमासाठी एकत्रित प्रयत्नातून कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सुरुवातीला महासंघाच्या वतीने उपस्थितांची ओळख व स्वागत झाल्यावर कर्वेनगर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. म्हाकवेकर यांनी संस्थांचा बँकेशी असलेला जुना संबंध, बँक पुरवत असलेल्या विविध टेक्नो बेस सर्व्हिसेस व विविध गुंतवणूक योजनांची तपशीलवार माहिती दिली. सरतेशेवटी बँकेकडे असलेले विविध तंत्रज्ञान व तत्पर सेवेचा लाभ देण्यासाठी बँक इच्छुक असून उपस्थित संस्थांनी शाखेत जास्तीत जास्त खाती उघडून या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

मा. उपनिबंधक श्री. मगर यांनी मार्गदर्शन केले. बँकेचे मा. सहमहाव्यवस्थापक श्री. दिलीप कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात बँकेबाबत माहिती दिली. तसेच या उपक्रमाबाबत मनोदय व्यक्त केला. सौ. सीमा भाकरे यांनी आभार प्रदर्शन केले.

शनिवार, नारायण पेठ शाखांचे बचत, चालू व हप्तेबंद ठेव अभियान उद्दिष्टपूर्तीसह यशस्वी

दिनांक १ जुलै २०१५ ते ३१ जुलै २०१५ काळात शाखेने बचत, चालू व हप्तेबंद ठेव खातेवृद्धी अभियान राबवण्याचा निर्धार केला होता. सेवकांच्या सभेत या बाबत निर्णय होऊन खालीलप्रमाणे खाते संकलनाचे उद्दिष्ट जुलै २०१५ या महिन्यात पूर्ण करण्याचा संकल्प केला गेला. अभियानाचे उद्घाटन श्री. काकतकर साहेब यांनी केले.

शनिवार, नारायण पेठ शाखेच्या परिसरात अनेक बँका असून चालू व बचत ठेव खाती अत्यंत अल्प प्रमाणात उघडली जात. चालू ठेव खाती उघडण्यात अनंत अडचणी येत होत्या. शाखा व्यवस्थापक काळे साहेब यांनी बाजीराव रोड शाखेचे मा. शाखा व्यवस्थापक श्री. ढवळीकर साहेब यांना मार्गदर्शनासाठी बोलावले. श्री. ढवळीकर साहेबांनी सर्वांचे मनोबल उंचावले. त्याबरहुकूम सर्व जण कामाला लागले. अगदी रविवारी सुट्टीच्या दिवशी सुद्धा सर्व जण चालू ठेव खाती संकलनासाठी फिरले. सेवकांच्या अथक प्रयत्नाने अवघड वाटणारे उद्दिष्ट पार झाले होते.

अभियान काळात आयोजित केलेले मोफत नेत्र तपासणी शिबिर व इन्व्हेस्टमेंट अवेअरनेस प्रोग्राम हे दोन कार्यक्रम चांगल्या प्रतिसादासह यशस्वी केले.

आर्थिक दान देणाऱ्यांसाठी बँक महत्त्वाचा दुवा ठरत आहे!

पुणे : बँकेकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या वासुदेव वामन गोखले स्मृती न्यासाचे वतीने गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणांसाठी आर्थिक साहाय्य करण्यात आले. २२ जणांना प्रत्येकी रु. ५०००/- प्रमाणे रु. १,१०,०००/- मदतीच्या धनादेशाचे वाटप या प्रसंगी करण्यात आले. मदतीचा धनादेश वितरण प्रसंगी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी आधिकारी श्री. वसंत कुलकर्णी बोलताना म्हणाले की, 'आजच्या जगात वावरताना समाजातील आर्थिक दरी लोकांना दिसत असते. योग्य व्यक्तींना मदत करण्याची इच्छा असूनसुद्धा व्यग्र जीवनशैलीमुळे वेळीच मदत करणे शक्य होत नाही. बँक समाजातील दानशूर व गरजू यांचा समन्वय साधते. आर्थिक दान देणाऱ्यांसाठी बँक महत्त्वाचा दुवा ठरत आहे.'

या प्रसंगी बोलताना बँकेचे सहमहाव्यवस्थापक श्री. जयंत काकतकर म्हणाले की, यातील बँकेची विश्वासाची भूमिका महत्त्वाची असून. विश्वस्त आणि समाजातील गरीब गरजू यांचा मेळ जमविण्यास बँक विविध ट्रस्टची कामे विश्वासाने करीत आहे.

या विभागामार्फत ट्रस्टच्या नोंदणी ते व्यवस्थापन तसेच इच्छापत्र तयार करण्यासाठी मदत व व्यवस्थापन करणे, याकामी तज्ज्ञ वकिलांचा सल्ला मिळवून देण्याचे कार्यही केले जाते, अशी माहिती विभागप्रमुख श्री. अतुल क्षीरसागर यांनी या प्रसंगी दिली.

➤ पान क्र. १ वरून ...

अध्यक्षांचे लेखणीतून

खातेदारांशी वरील बाबींद्वारे संपर्कात राहून त्याच्या कर्ज खात्याचे मॉनिटरिंग करणे अधिक सुलभ होईल. आता पुढचा प्रश्न येतो तो म्हणजे मॉनिटरिंग फक्त कर्ज खात्यांचेच करावयाचे का? तसे नव्हे, आपण बँकेत असलेल्या सर्वच व्यवहारांचे वेळोवेळी मॉनिटरिंग हे आवश्यकच आहे. बँकेचे सर्वच व्यवहार पैशांशी निगडित व जोखमीचे असतात. आपण कोणतेही काम करीत असू व त्या कामाच्या मॉनिटरिंगमध्ये कमी पडलो की आर्थिक नुकसान होण्याची शक्यता लगेच बळावते.

सतत निव्वळ सावध नव्हे तर दक्ष राहणे ही काळाची गरज झाली आहे. धोक्यांची संख्या, प्रकार व विविधता वाढली आहे. तेव्हा मॉनिटरिंग हे केवळ मोठ्या कर्जाचे व हेड ऑफिसचे काम, असा चुकीचा दृष्टिकोन असेल तर तो दूर करावा लागेल. गडबड करणाऱ्या मुलांवर लक्ष ठेवणारा वर्गातला मॉनिटर असतो. तसेच व्यवहारातील गडबडींवर लक्ष ठेवणारा सजग व जागरूक कर्मचारी हा बँकेचा मॉनिटर असतो. मॉनिटरचे काम आता सर्वांचेच!

– अरविंद खळदकर

ई-बँकिंगमुळे बँकिग क्षेत्रात आमूलाग्र बदल शक्य : मा. श्री. देवळे

ई-बँकिंगमुळे बँकिंग क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले असून या सेवेमुळे कमी कालावधीत जास्त सुविधा पुरविणे सहज शक्य झाले आहे, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक आफ इंडियाचे याचे सेवानिवृत्त चीफ जनरल मॅनेजर मा. रत्नाकर देवळे यांनी केले. आपली बँक लातूर शाखा व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३/१०/२०१५ रोजी आयोजित 'बँकिंग आज व उद्या' विषयावरील परिसंवादात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी होते. यावेळी संस्थेचे संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, लातूर शाखेचे व्यवस्थापक चंद्रशेखर प्रभुणे, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ॲनी जॉन, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आत्माराम पळणीटकर, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रशेखर ➤ पान क्र. ११ वर ...

अभिनंदन! बँकिंग परीक्षेमधील यशाचे मानकरी

कु. गायत्री विजय कमळापूरकर
पौड रोड शाखा, लेखनिक,
जे.ए.आय.आय.बी. उत्तीर्ण!

शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !

● कर्वेरोड	१० नोव्हेंबर
● ओतूर	७ डिसेंबर
● दादर	२१ डिसेंबर

औरंगाबाद शाखेचा अभिनंदनीय सामाजिक उपक्रम

आपल्या नजीकच्या मंदिर कन्या प्रशाला यांचे संस्थेचे - सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद - शताब्दी वर्ष साजरे होत आहे. सरस्वती भुवन शिक्षण संस्था, औरंगाबाद ही मराठवाड्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. त्यांचे शाळा विस्तार संपूर्ण मराठवाड्यात आहेत. त्यानिमित्ताने त्यांनी शनिवार, दि. ०५/०९/२०१५ रोजी एक रॅली आयोजित केली होती. त्या मध्ये सुमारे १००० विद्यार्थिनी सहभागी होत्या. शाखेने त्यानिमित्ताने रॅलीतील सहभागी सर्व विद्यार्थिनींना शीतपेय - फ्रुटीचे वाटप केले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. शाळेने या सामाजिक उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

भावपूर्ण श्रद्धांजली

बँकेच्या लातूर शाखेतील लेखनिक
चिंतामणी भालचंद्र बर्दापूरकर
यांचे दि. १० सप्टेंबर २०१५ रोजी दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्गती देवो.

कै. बर्दापूरकर यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात जनता बँक परिवार सहभागी आहे.

ताणतणावांवर पुष्पौषधे – भाग २

व्हाईट चेस्टनट – सर्व लक्षणांना पळवून लावते, अचानक दगा देणारी स्मरणशक्ती मनुष्याला गोत्यात आणते. व्यक्तीचे नावच न आठवणे, एखाद्या मुद्द्याचा संदर्भ किंवा तपशील सांगता न येणे, इंटरव्ह्यू देताना उत्तर न सुचणे यामुळे मनुष्याचे हसे होते. भाषण देताना अडथळा येतो. व्हाईट चेस्टनटमुळे स्मरणशक्ती पूर्वपदावर येते.

बैठ्या स्वरूपाचं काम, व्यायामाच्या अभावामुळे आतड्यांची हालचाल मंदावून अवरोध जडण्यावर व्हाईट चेस्टनट चांगले लागू पडते. विचारांची गर्दी हटवता न आल्यास मेंदूवर अतिरिक्त भार पडून तो दमतो. विचारचक्र थांबवू न शकल्याने मेंदू पोखरला जातोय असं वाटून झोपेचा बट्ट्याबोळ होतो, कितीतरी वेळ अंथरुणावर पडून राहूनही शांत झोप लागत नाही. अपुऱ्या झोपेमुळे मनुष्य निस्तेज, अशक्त होतो. व्हाईट चेस्टनट मेंदूचा अतिउत्तेजितपणा कमी करते. तणावामुळे डोळे सतत मिचकावणे, नखे कुरतडणे अनावश्यक हातवारे करणे, पाय हलवणे यासारख्या निरर्थक, निरुपयोगी लकबी घालवण्यासाठी व्हाईट चेस्टनट देतात.

पाईन – स्वतःहून झालेल्या चुकीची बोच मनुष्याला अस्वस्थ, असंतुष्ट, निराश करते. चुकांपायी काम पूर्ण होण्यास विलंब होतो. चूक मुद्दाम केली काय अशा शंकेने चुकणाऱ्या बद्दल गैरसमज होऊ शकतात. चुकणाऱ्यांबरोबर सहकार्य न करण्याची किंवा सूड उगवण्याची भावना उत्पन्न होऊ शकते. घडलेल्या चुकांची खंत वाटणे हे प्रामाणिकपणाचे, सद्वृत्तीचे द्योतक आहे. व्यक्ती बेफिकीर नसल्याचे दर्शक

आहे. पण त्याचे अतिरिक्त किंवा न झेपण्याजोगे प्रमाण व्यक्तीला दुःखी करते. मनावरील तणाव वाढवते. आपल्यामुळे कुणावर अन्याय झाला की काय, त्याची संधी हिरावली गेली काय, प्रगतीत अडथळा आला की काय या विचाराने मन खाते. स्वतःला कमी लेखण्यामुळे पाईनचा पेशंट नाराज राहतो. आपली कामगिरी म्हणावी तितकी चांगली झाली नाही म्हणजे आपण लायकच नाही आहोत असे वाटून खिन्न होतो. शारीरिक व्यंग पाईन दिल्याने सुधारणा होते.

ॲग्रीमनी – या पुष्पौषधाचे पेशंट्स तर कितीतरी आढळतात पण त्यांना ॲग्रीमनीची गरज आहे हे कौशल्याने ओळखावे लागते. तसेच कामकाजाच्या ठिकाणी सदानकदा संघर्ष, अपेक्षाभंग, अपमान, अपयशामुळे सुख हरपते आणि पापणीआड लपलेला पाऊस केव्हाही कोसळू लागतो. सुखाच्या क्षणांची अट्टाहासानं माळ केली, धाग्याच्या टोकाला गाठ घालायची राहून गेली अशी दैना होते. सततच्या तणावामुळे मनुष्य दुःखी, हळवा होतो. पण दुःखाची चर्चा, प्रदर्शन करणे ज्याला आवडत नाही, त्याला ॲग्रीमनी देतात. तो मुकाट्यानं दुःख सोसतो. भिडस्तपणा, दुसऱ्याला न दुखवण्याची कमालीची दक्षता घेणे, मोजके बोलणे ही ॲग्रीमनी पेशंटची वैशिष्ट्ये आहेत. स्वतःची दुःखे, संकटे, तणावांविषयी बोलणे टाळण्याच्या त्याच्या स्वभावामुळे त्याच्या त्रासाची आणि औषधाची त्याला असलेल्या गरजेची कल्पना इतरांना येत नाही. दुःख कोंडल्यामुळे ॲग्रीमनीच्या पेशंटला अपचन नीट न होणे, भूक न लागणे, आम्लपित्त, निद्रानाश, इसब, पुरळ, सोरिॲसिससारखे त्वचारोग होतात. ॲग्रीमनी देण्याने त्याच्या बोलण्या-वागण्यात मोकळेपणा येतो. झोपलेले हास्य चेहऱ्यावर परत येते. दुःख उणावल्यामुळे प्रसन्नता येते.

मानसिक त्रास असल्याचे कबूल करण्यात कमीपणा मानू नये, लपवू नये, दुर्लक्ष करू नये. समस्यांमध्ये गुरफटून राहून त्या वाढवण्याऐवजी त्यातून बाहेर येण्यासाठी पुष्पौषधे वापरावीत. आपण छान असणे, प्रगती करणे महत्त्वाचे असते, जरूरीचे असते. पुष्पौषधे होमिओपॅथिक परवडण्याजोगा किमतीत मिळतात. त्रास सहन होईनासा झाल्यानंतरच बहुदा लोक उपचारासाठी येतात. तोपर्यंत लक्षणे जुनी झालेली असतात. ती घालवण्यासाठी सहा महिने औषधे घेताना कुरकुर करणे योग्य नाही. चांगल्या घटना सावकाश घडत असतात. त्रास असल्याचे मान्य करणे आणि पुष्पौषधे घेणे या दोन पायऱ्या ओलांडल्यानंतरच बरे होणे ही तिसरी पायरी गाठता येते. मन स्वच्छ, खुले, निरोगी, सक्षम झाले की प्रगतीची वाट सुकर होऊन विकासाची दालने खुली होतात.

सौ. सरोज शरद भडभडे, पुणे
मो : ९८५०९७७८७५

...जरा याद करो कुर्बानी

देशासाठी शहीद झालेल्यांबरोबरच स्वातंत्र्यानंतरही देशासाठी शहीद झालेल्यांचे नित्य स्मरण करणे हे आपले निश्चित कर्तव्य आहे. याचाच एक भाग म्हणून अशाच शहिदांचे स्मरण करण्याचा कार्यक्रम बाजीराव रोड शाखेत शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०१५ रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित केला होता.

या कार्यक्रमास वीरपत्नी दिपाली विजय मोरे यांना बोलावले होते. भारतमातेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. वीरपत्नी दिपाली विजय मोरे यांना बँकेच्या संचालिका सौ. कसबेकर यांनी साडी व रु. २१०००/- रकमेची थैली देऊन सन्मानित करण्यात आले. सन २००४ साली पंजाबमध्ये अतिरेकी यांनी लष्करी छावणीवर केलेल्या हल्ल्यामध्ये छावणीच्या संरक्षणार्थ झालेल्या चकमकीत कै. विजय मोरे शहीद झाले.

सैनिक मित्र परिवाराचे अध्यक्ष श्री. अशोक मेहेंदळे व सेक्रटरी श्री. आनंद सराफ, श्री. घारे तसेच शाखेतील खातेदार व शाखा परिसरातील प्रतिष्ठित व्यक्ती श्री. उदय जगताप उपस्थित होते. बँकेचे संचालक मा. श्री. मुतालिक साहेब, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलकर्णी तसेच मुख्य कचेरीतील निरनिराळ्या विभागातील वरिष्ठ अधिकारी, विविध शाखांचे शाखाव्यवस्थापक यांनी सर्वांचे स्वागत केले; तर पाहुण्यांचा परिचय श्री. पराग ठाकूर यांनी करून दिला. आभारप्रदर्शन श्री. विलास कुलकर्णी यांनी केले.

इच्छापत्राकडे संकल्पपत्र म्हणून पहा!

आजच्या काळात प्रगतीमुळे आर्थिक विकासामुळे राहणीमान व आयुष्यमान ही वाढले आहे. त्यामुळे वृद्धापकाळ ही वाढलेला दिसतो. तसेच एकत्र कुटुंब पद्धती संपुष्टात आलेली असल्याने एकाकीपणामुळे किंवा विविध कारणांनी अनेकांना असुरक्षित वाटत आहे. त्यात संपत्तीसाठीचे भांडणे ही नित्याचीच बाब झालेली आहे. त्यातून भर म्हणजे टी.व्ही., वर्तमानपत्र, इत्यादी मार्गातून आपल्यापर्यंत आलेल्या बातम्या त्यातून अस्वस्थपणा येत असतो. प्रत्येकाला वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासलेले आहे. अनेकजण अनेक सल्ले संपत्तीच्या वाटपासंदर्भात देत असतात, त्यावेळेस आपल्याला योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता भासते. त्यामुळे अगोदर आपण काही समस्या पाहू व त्यानंतर इच्छापत्रा बाबतची माहिती घेऊ.

समस्या :

१) स्वमालकीचे घर आहे. मुले स्वतंत्रपणे वेगवेगळ्या ठिकाणी राहतात मुले विचारत नाहीत निर्णय काय घ्यायचा?

२) घर आहे पैसा आहे मुलांपैकी एकजण कमकुवत आहे. उदा. (शारीरिक/ मानसिक/ आर्थिक) अशावेळी आपले आपले पश्चात त्याच्या जबाबदारीचे काय?

३) पत्नीला व्यवहार ज्ञान नाही आपले पश्चात तिचे काय होणार?

४) मुलगा किंवा जावई दुर्व्यसनी आहेत संपत्ती कोणाकडे सुपूर्द करणार?

५) दोन्ही मुलीच आहेत, एकीची परिस्थिती आर्थिक बाजूने कमकुवत आहे. एकाला झुकते माप द्यावे की नाही?

६) तरुण मुलाच्या निधनानंतर संपत्ती सुनेला द्यावी का? संपत्ती मिळाल्यावर तिने दुसरे लग्न करून आपला किंवा नातवंडाचा सांभाळ नाही केला तर?

७) अपत्य नाही जवळचे नातलग कोणी नाही संपत्तीचे काय करावे?

या व अशा प्रकारच्या अनेक समस्यांनी आपल्याला ग्रासलेले असते त्यावर संपत्तीच्या वाटपात आपण इच्छापत्राचा साधन म्हणून उपयोग कसा करून घ्यावा, याचा योग्य अभ्यास करून निर्णय घ्यावा. आपण आयुष्य भर तिळतिळ करून साठवलेली आपली संपत्ती आपल्या जिवंतपणी दुसऱ्याला देऊन मग पस्तावण्यापेक्षा आपण इच्छापत्र करून आपल्यानंतर संपत्तीचे वाटप केल्यास काय योग्य ठरेल, याचा विचार वेळीच करून समस्येतून मार्ग काढावा व पुढची होणारी गुंतागुंत टाळावी, असे प्रत्येकाला वाटत असते.

माणसाला आयुष्यात प्रत्येकाला कोणतीतरी चिंता सतावत असते, उदा. लहानपणी अभ्यास, तरुणपणी नोकरी/ कामधंदा मिळवणे, पैसे कमावणे व त्यातून अधिकाधिक संपत्ती निर्माण करणे आणि ती टिकवणे.

त्यानंतर आपल्या पश्चात आपण साठवलेली संपत्ती योग्य प्रमाणात योग्य वारसास, जर वारस नसेल तर योग्य व्यक्ती/ संस्थांना मिळावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. ते लिहून ठेवणे म्हणजे इच्छापत्र, व्यक्ती, आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीचे इच्छापत्र करू शकते. आपल्या आयुष्यभरात आपण कमावलेल्या संपत्तीचे वाटप आपले पश्चात कुटुंबात कोणतेही वाद न होता व्हावे, हे प्रमुख कारण जरी इच्छापत्राचे वाटत असले तरी अनेक फायदे त्यामागे आहेत.

- इच्छापत्रात एका पेक्षा अधिक व्यक्ती/ संस्था लाभधारक म्हणून नोंद करता येऊ शकतात.
- इच्छापत्रात कितीही वेळा ती करणारी व्यक्ती पुरवणी इच्छापत्र करून बदल करू शकते.
- इच्छापत्रात कोणी आव्हान दिल्यास न्यायालयाकडून प्रोबेट मिळविता येते.
- इच्छापत्र रजिस्टर करणे बंधनकारक नाही.
- इच्छापत्र गोपनीय ठेवता येऊ शकते.
- इच्छापत्र सुरक्षित राहण्यासाठी ते बँकेच्या कस्टडीत ठेवता येऊ शकते.
- इच्छापत्र व्यवस्थापक म्हणून बँकेबरोबर अन्य जवळची/ नातेवाईक व्यक्तीसुद्धा नेमता येऊ शकते.

आजच्या काळात जीवनमान समृद्ध झाल्याने अनेक सुखसोयी असून सुद्धा आपल्या संपत्तीविषयी तिच्या सुरक्षेतेसाठी नेहमीच काळजी प्रत्येकाला वाटत असते. काहींच्या संपत्तीला वारस असला तरी काहींच्या संपतीला वारस नसला तरी काळजी वाटत असते. अशा वेळी योग्य सल्याची आवश्यकता भासत असते. असा सल्ला देण्याचे काम जनता सहकारी बँक एक्झिक्युटर ट्रस्टी विभागामार्फत केले जाते. हा विभाग फक्त सल्लाच देते असे नसून त्या अनुषंगाने असणारी विविध प्रकारची कामे ही या विभागामार्फत केली जातात. उदा. इच्छापत्र करणे आणि त्यानुसार कार्यवाही करणे.

खासगी व सार्वजनिक ट्रस्ट निर्माण करणे व त्याचे व्यवस्थापन पहाणे. त्यात ट्रस्टचे लेखापरीक्षण करून घेणे, सभा घेणे इत्यादी प्रकारच्या कामाचा समावेश आहे. मृत्युंजय मंत्राच्या साहाय्याने माणसाने परमेश्वराजवळ विनासायास मरणासाठी प्रार्थना केली आहे. झाडाला फळ लागून ते वाढते. पुढे ते पिकून अलगदपणे जसे खाली येते तसाच अलगदपणे मृत्यू यावा अशी सर्वांची अपेक्षा असते. अनेकांना असं वाटतं की, मृत्युपत्रावर सही केली की लगेच मरण येईल. जीवन जसा प्रवास आहे तसा इच्छापत्र करणे हा प्रयास आहे. इच्छापत्र तयार केल्याने ते करणाऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा येत नाही. इच्छापत्र जरी रुक्ष वाटत असले तरी त्याच्याकडे आपला संकल्प म्हणून पाहिले तर त्यास पावित्र्य प्राप्त होईल. इच्छापत्र ही शेवटची इच्छा असल्याने कायद्यासह सर्वजण त्याचा आदर ठेवतात.

इच्छापत्र का करावयाचे?

इच्छापत्र न करता मृत्यू आला तर काय होईल, कदाचित संपत्तीसाठी वारसदारात भांडणे लागतील. रक्ताच्या नात्यात हाडवैर निर्माण होऊन घरात अशांतता माजेल प्रकरण न्यायालयात जावून प्रियजन संपत्तीच्या उपभोगापासून वंचित राहतील. आपल्या संपत्तीची वाटणी आपल्या इच्छेप्रमाणे होणार नाही. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती त्या प्रमाणे प्रत्येकात फरक असतो. आपल्या हाताची बोटेसुद्धा सारखी नसतात. तशी आपल्या मुलांची बौद्धीक, शारीरिक, आर्थिक क्षमता सुद्धा वेगवेगळी असते. त्यांच्यात डावे उजवे कोणीतरी असतेच. जीवनात सर्वांना समान संधी मिळाली तरी कोणीतरी मागे पुढे असतोच. ज्याला आर्थिक आवश्यकता अधिक असते त्याला अधिक मिळावे असे वाटत असते व ज्याला

कमी प्रमाणात आवश्यकता असते त्याला कमी मिळाले तरी चालते. परंतु कायद्याप्रमाणे सर्वजण समान असतात, त्याप्रमाणे संपत्तीची वाटणी केली जाणार. आपली इच्छा व क्षमता असूनसुद्धा आपण आपल्या कमी क्षमतेच्या मुलासाठी झुकते माप देऊ शकणार नाही. त्याच्यासाठी काहीही करू शकत नाहीत याची खंत त्या दुबळ्या मुलास आयुष्यभर राहणार. म्हणून आपण कमावलेल्या संपत्तीची वाटणी आपल्या पश्चात कशी करावयाची हे आपण आपल्या जिवंतपणी ठरवून ठेवू शकता. त्याकरिता इच्छापत्र करण्याची आवश्यकता आहे. आणि ते तयार करण्याची चांगली वेळ म्हणजे आजचा दिवस कारण उद्या काही जणाकरिता यदाकदाचित उशीर झाला असण्याची शक्यता असते.

इच्छापत्र कोण करू शकतो?

इच्छापत्र करणाऱ्या व्यक्तीस आपण काय करतो हे समजण्याची मानसिक क्षमता असली पाहिजे. कायद्याने अज्ञान व्यक्तीस ही इच्छापत्र करता येते. (त्यास काही अटी असतात.) अविवाहित व्यक्तीसही इच्छापत्र करता येते. परंतु त्याच्या विवाहानंतर ते रद्द होते. (नववधूचे हितसंबंध जपण्याची ही तरतूद आहे.) विशिष्ट परिस्थितीत सीमेवरील सैनिक तोंडीसुद्धा इच्छापत्र करू शकतात.

इच्छापत्र तपशील : इच्छापत्र तयार करताना महत्त्वाचे (घटक) तपशील देणे आवश्यक आहे.

१) इच्छापत्र तयार करणाऱ्याची सर्व आवश्यक ती माहिती नाव, पत्ता इ.
२) त्यांच्या संपत्तीचा उगम व त्यातील महत्त्वाचे टप्पे
३) वारसदारांची माहिती.
४) वारसदार नसतील तर तसा उल्लेख.
५) संपत्तीचा सविस्तर तपशील,
६) संपत्तीची आपले पश्चात कशी विभागणी करावी त्याची माहिती. इच्छापत्र जरी आपण जिवंतपणी केलेले असले तरी त्यांची अंमलबजावणी आपले पश्चात होणार असल्याने त्यास अडथळा येणार नाही अशासाठी तपशील देणे आवश्यक आहे. थोडक्यात मुद्देसूद तपशील देणे आवश्यक.

इच्छापत्र बदलता येते का?

इच्छापत्र करणाऱ्यांच्या हयातीत त्यांची मानसिक क्षमता योग्य असेपर्यंत एकदा केलेले इच्छापत्र कितीही वेळा बदलता येते. त्यास पुरवणी इच्छापत्र म्हणतात किंवा ते पूर्ण रद्द करून नवीन ही करता येऊ शकते.

इच्छापत्र गोपनीयता :

इच्छापत्र गोपनीय ठेवता येऊ शकते. त्यातील मजकूर संबंधितांना कळला तर त्यातील असमाधानी लाभधारकाकडून कदाचित त्रास होण्याची शक्यता असते. व त्या दबावाखाली आपण त्यात बदल केल्यास आपल्या इच्छेविरुद्ध होईल. म्हणून सावधपणे इच्छापत्राबाबत गोपनीयता पाळता येऊ शकते.

इच्छापत्र व्यवस्थापन :

इच्छापत्राचे व्यवस्थापन आपले इच्छे नुसार होण्यासाठी ज्या व्यक्तीवर पूर्ण विश्वास आहे व त्याची तशी क्षमता असेल त्याचीच निवड व्यवस्थापक म्हणून करावी. नेमलेला व्यवस्थापक अडचणी पाहून जबाबदारीचा त्याग करणार नाही याची खात्री असावी. जबाबदारी पूर्णपणे पेलेल, संपत्तीची देखभाल काळजीपूर्वक करेल, संपत्तीची विभागणी आपल्या इच्छापत्राप्रमाणेच करेल व विविध प्रलोभनांना बळी पडणार नाही, कायदेशीरबाबी निर्माण झाल्या तर त्या व्यवस्थीत हाताळून त्याची पूर्तता करण्याची क्षमता त्याच्याकडे असावी. दुसऱ्यांचे हित रक्षणासाठी विश्वस्तांना (एक्झिक्युटर किंवा ट्रस्टी) यांना मालमत्तेसंबंधी कायदेशीर अधिकार असतात. म्हणून व्यवस्थापक निवडताना पूर्ण काळजीपूर्वक व अभ्यास करून निर्णय घ्यावा. व्यक्तीपेक्षा संस्थेला व्यवस्थापक म्हणून निवडल्यास आपल्या इच्छापत्राची अंमलबजावणी अधिक योग्य प्रकारे केली जाऊ शकते. बँक अशा कामासाठी तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करते व त्याचा फायदा ग्राहकांस होतो.

ज्येष्ठ नागरिक समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. नुसते जगण्यापेक्षा आपल्या जगण्याचा दर्जा वाढवून ते जगत असतात. अनेक जण परिवर्तनाला सामोरे जावून विविध प्रकारचे संकल्प ते करीत असतात. आपल्या मृत्यूनंतर नेत्रदान, देहदान, संपत्तीदान करून समाजात चांगल्या रूढी निर्माण करताना दिसतात.

तसेच इच्छापत्राकडेही संकल्प पत्र म्हणून पाहण्याची दृष्टी दिल्यास इच्छापत्राचे ही पावित्र्य वाढून योग्य वेळी इच्छापत्र करण्यासाठी समाजमन तयार होईल व इच्छापत्र संकल्पपत्र म्हणून ओळखले जाईल, यात शंका वाटत नाही.

– अर्जुन वडतिले
मो. ९८२३७ २५७४०

'तळेगाव स्टेशन शाखेतर्फे गॅरेज मालक संघटना कार्यक्रम संपन्न'

तळेगाव स्टेशन शाखा व तळेगाव दाभाडे ऑटोमोबाईल असोसिएशन अशा संयुक्त विद्यमाने 'व्यवसायातून मिळविलेला पैसा व त्याचे व्यवस्थापन' या विषयावर कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमास मुख्य कचेरीतील DGM मा. आनंद सोहोनी यांनी सभेला संबोधित केले. या वेळी मान्यवर तळेगाव दाभाडे ऑटोमोबाईल असोसिएशनचे पदाधिकारी मा. सुनील किरवे, मा. बाळू कदम, मा. श्रीकांत शेळके, मा. रमेश घोजगे उपस्थित होते. शाखाव्यवस्थापक मा. नरेश मिटेल्लू यांनी पुष्पगुच्छ देऊन सर्वांचे बँकेचे वतीने स्वागत केले.

'व्यवसायातून कमविलेला पैसा व त्याचे व्यवस्थापन' या विषयावर अत्यंत खुमासदार पण साध्या सोप्या शैलीत बँकेचे गुंतवणूक विभागाचे मुख्य कचेरीचे DGM मा. आनंद सोहोनी यांनी आपले विचार मांडले.

त्याचप्रमाणे नरेंद्र ट्रेडर्स प्रोप्रा. संजय हुंडेकरी यांनी मनोगत व्यक्त केले. 'रेलिगेअर' या नवीन प्रॉडक्टची माहिती श्री. निलेश घोलप यांनी दिली. तळेगाव दाभाडे ऑटोमोबाईल असोसिएशनचे अध्यक्ष मा. बापू कदम यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी ननावरे यांनी केले.

कोल्हापूर शाखेने शिक्षक दिनानिमित्त दिली विविध शाळांना भेट

दिनांक ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिनाचे' औचित्य साधून समस्त शिक्षकवृन्दाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपल्या कोल्हापूर शाखेमार्फत विविध शाळांना भेट देण्याचा कार्यक्रम करण्यात आला.

संबंध शाळांमध्ये जाऊन शाळांमधील सर्व शिक्षकांसमोर त्यांच्याप्रती बँकेतर्फे कृतज्ञता व्यक्त केली व शाखेतर्फे शिक्षक दिनाच्या शुभेच्छांसह पेढ्यांचा बॉक्स व कृतज्ञता व्यक्त करणारे पत्र देण्यात आले. सर्व शाळांमधील शिक्षकांनी बँकेच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

कै. सौ. भाग्यश्री सुरेश चितळे खासगी विश्वस्त निधी

कै. सौ. भाग्यश्री चितळे या आपल्या बँकेच्या संचालिका म्हणून १३ वर्षे कार्यरत होत्या. त्यांचे मागील वर्षी दि. १०.९.२०१४ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतिपीत्यर्थ श्री. सुरेश आत्माराम चितळे यांनी त्यांच्या दिवंगत पत्नी कै. सौ. भाग्यश्री सुरेश चितळे यांच्या नावाने एक खासगी ट्रस्ट सामाजिक कार्यासाठी नुकताच निर्माण केला आहे.

विश्वस्त निधीचे नाव : सौ. भाग्यश्री सुरेश चितळे खासगी विश्वस्त निधी

निधीचा उद्देश : १) जनता सह. बँक लि. पुणे आदर्श शाखा प्रतिवर्षी निवडून ३ शाखांना पुरस्कार देणे. प्रथम क्रमांक १०,०००/- द्वितीय क्रमांक ८,०००/- तृतीय क्रमांक ५,०००/- २) सरस्वती महिला नागरी सह. पतसंस्थेद्वारा भाग्यश्री शिष्यवृत्ती योजना चालविणे. त्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक मदत प्रतिवर्षी करणे. ३) अन्य सामाजिक कार्ये.

दिनांक १० सप्टेंबर २०१५ या दिवशी कै. सौ. चितळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. चितळे यांनी त्यांच्या घरी काही सामाजिक संघटना बोलावून निधी देणगी स्वरूपात देण्यात आला. त्यात बँकेच्या शाखेच्या पुरस्कारांसाठी देण्यात आलेला निधी बँकेच्या मा. संचालिका डॉ. सौ. कसबेकर यांनी स्वीकारला. या प्रसंगी कै. चितळे यांच्या बँकेविषयी योगदानाबद्दलची माहिती ही डॉ. सौ. कसबेकर यांनी दिली.

या प्रसंगी विविध संस्थांनी आपल्या सामाजिक कार्याची माहिती दिली, तर एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागातील कामकाजाची माहितीही बँकेच्या वतीने देण्यात आली.

कै. सौ. चितळे यांच्या सामाजिक कार्याची ओळख सामाजिक कार्यकर्त्यांना होण्यासाठी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ (स्मरणिका/ स्मृतिगंध) काढावा. त्यासाठी सरस्वती महिला नागरी सह. पतसंस्था यांनी पुढाकार घ्यावा, अशी चर्चा या वेळी झाली आहे.

कै. सौ. भाग्यश्री सुरेश चितळे सामाजिक कामाचा अल्प परिचय :

कै. सौ. भाग्यश्री सुरेश चितळे म्हणजे पूर्वाश्रमीच्या विद्या गोपाळ दीक्षित. त्यांनी पुण्यातून स. प. महाविद्यालयातून B.A. Economics पदवी प्राप्त केली आणि शिक्षण पूर्ण होताच १९७२ साली वैवाहिक जीवनाला सुरुवात झाली. श्री. सुरेशराव चितळे यांची इंजिनिअरिंग क्षेत्रातील खासगी कंपनीतील नोकरी आणि अगदी पाठोपाठची दोन मुले यामुळे लग्नानंतरचा त्यांचा सुरुवातीचा काळ हा स्वाभाविकपणे मुलांच्या संगोपनांमध्ये गेला. उच्च शिक्षण, नोकरी, व्यवसाय असे लौकिक अर्थाने करिअर म्हणून संबोधले जाणारे कोणतेही टप्पे त्यांच्या जीवनात नव्हते. परंतु आर्थिक, कौटुंबिक आणि सामाजिक अशा सर्व स्तरांवर अतिशय आशयपूर्ण, संतुलित आणि समाधानी असा त्यांचा आदर्श जीवनपट आहे. सुरुवातीच्या श्री. सुरेश चितळे यांच्या नोकरीतील उत्पन्नाचे उत्तम अर्थनियोजन करून घर चालवणे आणि नंतर त्यांची स्वतंत्र व्यवसाय सुरू केल्यानंतर व्यवसायाच्या अर्थ व्यवस्थापनातील त्यांचा सक्रिय सहभाग यामुळे श्री. सुरेश चितळे यांनी कमावलेल्या यश आणि वैभवातील त्या खरोखरीने बरोबरीच्या भागीदार ठरल्या. कौटुंबिक उत्कर्षाबरोबरच आयुष्यातला प्रत्येक टप्प्यावर त्यांनी त्या त्या वेळच्या त्यांच्या सामाजिक परिघांमध्ये उत्साहपूर्ण सक्रिय सहभाग घेऊन ठसा उमटवला. १९८१-८२ साली मैत्रिणींच्या साहाय्याने ७०-८० मुले एका वेळी जमत असलेला संध्याकाळच्या वेळेत चालविलेला संस्कार वर्ग, 'उपेंद्र गृहसंकुलातील' सर्व सार्वजनिक उपक्रमातील त्यांचे नेतृत्व आणि अभिनव प्राथमिक शाळा व सौ. विमलाबाई गरवारे प्रशालेच्या पालक शिक्षक संघातील उत्साही, सकारात्मक व सहकारात्मक पालक प्रतिनिधी म्हणून निर्माण झालेली त्यांची ओळख ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सहज सामाजिक सहभागाची अनेकांच्या आजची स्मरणात असलेली काही मोजकी उदाहरणे.

व्यापक स्तरावरील सामाजिक उपक्रमातील त्यांच्या योगदानाची खरी सुरुवात झाली ती २ नोव्हेंबर १९९१ साली स्थापन झालेल्या सरस्वती महिला पतसंस्था या संस्थेपासून. पतसंथेच्या स्थापनापूर्व परिश्रमांपासून २०१३ सालपर्यंत सलग २३ वर्षे त्यांनी संस्थेच्या कामकाजातील अनेक महत्त्वपूर्ण दायित्व यशस्वीपणे पेलली. संचालिका, कोषाध्यक्ष, उपाध्यक्ष, अध्यक्ष व सल्लागार ही सर्व पदे त्यांनी विविध कालावधीत सांभाळली. एक कुशल संघटक आणि परिपक्व कार्यकर्त्याची निर्मोही आणि निर्लेप मानसिकता यामुळे पतसंस्थेच्या कामाचा त्या नेहमीच मोठा आधारस्तंभ राहिल्या.

प्रसिद्धिपराङ्:मुख स्वभाव आणि 'टीम वर्क' वरील ठाम विश्वास यामुळे त्यांनी अनेक मने जोडली. आणि पतसंस्थेच्या यशाचे ते एक मोठे गमक ठरले. पतसंस्थेच्या स्थापनेमधील मूळ उद्दिष्ट निम्न आर्थिक स्तरातील कुटुंबांचा सर्वंकष उत्कर्ष हे असल्यामुळे केवळ बचत किंवा अर्थविषयक उलाढाली असे संस्थेचे स्वरूप न राहता, संस्थेचे उपक्रम समाजाभिमुख व्हावेत म्हणून त्या सतत प्रयत्नशील राहिल्या.

सरस्वती पतसंस्थे पाठोपाठ 'विकास साधक वाहिनी' या संस्थेमार्फत चालविले जाणारे पूर्वांचल छात्रावास हे पूर्वांचलातील मुलींचे पुण्यातील वसतिगृह हा त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेला दुसरा सामाजिक प्रकल्प!

आपल्या बँकेच्या अडचणीच्या काळात संचालक मंडळातील दोन महिला सदस्यांपैकी एक म्हणून कै. सौ. चितळे यांनी या कामात यावे, असे संघ रचनेतून सुचविण्यात आले. बँकेच्या अत्यंत कठीण काळातही तत्कालीन संचालक मंडळ आणि संघ रचनेवर पूर्ण विश्वास ठेवून त्यांनी त्यांचे पती श्री. सुरेश चितळे यांच्या पाठिंब्याने हे आव्हान स्वीकारण्याचे ठरविले. इकॉनॉमिक्समधले शिक्षण आणि पतसंस्थेच्या उभारणीमध्ये शून्यापासून सुरुवात केलेले काम या अनुभवाचा त्यांना बँकेमध्ये काम करताना निश्चितच उपयोग झाला. कर्ज परतफेडीमध्ये अडखळलेली खाती, त्यांची कर्ज वसुली यासाठी त्यांनी मेहनत घेतली.

उत्साहाने वरील तीनही संस्थांमध्ये अखंड सहभागी असूनही समाजाच्या गरजांच्या मानाने आपला प्रयत्न म्हणजे खारीचा वाटा आहे, अशीच विनम्र भावना त्या नेहमी व्यक्त करीत असत.

– सौ. सुचेता अजिंक्य कुलकर्णी, पुणे

रक्षाबंधननिमित्त सिंदोन गावातील खाते ओपनिंग अभियान

औरंगाबादपासून २० किमी अंतरावरील सिंदोन नावाचे १८८ उंबऱ्याचे गांव, डोंगर कपारीत वसलेले, दुष्काळ कायमच गावाच्या पाचवीला पुजलेला. गावात पिण्याचे पाणी देखील नाही, पंचायत समितीचे टँकर पाणी घेऊन यायचे व गावाची तहान कशीबशी भागायची. शेतकऱ्यांनी जमिनी विकायला सुरुवात केलेली, ही सगळी परीस्थिती पाहून, २०१२ साली ग्रामविकास प्रतिष्ठान या संस्थेचे श्री. नरहरी शिवपुरे या अवलियाने ध्यास घेतला हे बदलण्याचा, गाव जलयुक्त करण्याचा, त्यांनी कामाला सुरुवात केली. तीन वर्षांतच गावाने कात टाकली, पाणी नियोजनाने विहिरी भरल्या, सर्व शिवारे हिरवेगार झाली. पण अजूनही काही प्रश्न शिल्लक आहेत. जवळपास बँक नाही, बरीच घरे बँक परिघाबाहेर आहेत. जन-धन योजना येऊनही गावातील महिलांची बँक खाती नाहीत. ग्राम विकास प्रतिष्ठानच्या श्री. शिवपुरे यांचे सोबत प्रवास करताना, आपणही बँक म्हणून काहीतरी केले पाहिजे असे वाटले. त्यामुळे आपण संकल्प केला त्यांना बँकिंग सुविधा देण्याचा. ग्रामविकास प्रतिष्ठान, मराठवाडा युवक विकास मंडळ यांचे सोबत बैठक झाली व कामाचा पहिला टप्पा नक्की केला. गावातील सर्व महिलांची खाती उघडायची आणि प्रत्येक महिलेचा पंतप्रधान विमा सुरक्षा योजनेअंतर्गत विमा उतरवून, सर्व महिलांना रक्षाबंधनाची ओवळणी द्यायची. कार्यक्रम नक्की झाल्यावर, आपण १९८ महिलांची खाती उघडली व मराठवाडा युवक विकास मंडळाने विम्याची रक्कम भरली. गावातील एकूण २२३ पात्र महिलांचा विमा उतरविला. बहुधा हा मराठवाड्यातील पहिला प्रयोग असावा, ज्या गावातील १०० टक्के पात्र महिलांना विमा संरक्षण मिळाले. अनोखी गोष्ट असल्याने विमा पावती वितरण कार्यकम मोठा करावा, अस ठरवून, महाराष्ट्र विधानसभेचे

अध्यक्ष मा. श्री. हरिभाऊ बागडे यांचे हस्ते विमा पावती वितरण करण्यात आले. या वेळी उपजिल्हाअधिकारी तहसीलदार आणि राजकीय/सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते, गावकऱ्यांनीही भरपूर प्रतिसाद दिला. साधारणत: ३०० ते ३५० महिला-पुरुष सहभागी होते. महिलांनी मा. हरिभाऊ बागडे व आम्हास राख्या बांधल्या व त्यानंतर ओवाळणी म्हणून विमा पावती देण्यात आली. कार्यक्रमात आपल्या बँकेचे कौतुक करून अन्यही बँकेच्या सुविधा गावकऱ्यांना पुरविण्याचे आवाहन श्री. हरिभाऊ बागडे यांनी केले.

'अभिजात'... स्वरस्नेह, अवीट गोडीचा...

'अभिजात' ही संस्था म्हणजे कला आणि संस्कृतीविषयी मनापासून प्रेम असणाऱ्या आणि त्यांच्या जतन- संवर्धनासाठी प्रयत्नशील असलेल्या समविचारी संगीतरसिकांचा अनौपचारिक स्नेहसमूह आहे. पुण्याच्या जनता सहकारी बँकेच्या सेवेत असणाऱ्या सहकाऱ्यांनी स्थापन केलेली ही संस्था गेली चार वर्षे सातत्याने कार्यरत आहे.

सर्वसामान्य संगीतरसिकांमध्ये अभिजात संगीताविषयी गोडी निर्माण व्हावी, त्यांची अभिरुची संपन्न व्हावी आणि त्यांची आस्वादकता विकसित व्हावी यासाठी 'अभिजात' प्रयत्नशील आहे. पैसा मिळवणे किंवा नफा कमवणे असे उद्दिष्ट न ठेवता अधिकाधिक रसिकांना स्वरानंदाची अनुभूती सहजपणे घेता यावी, या हेतूने 'अभिजात' नामवंतांचा सहभाग असलेल्या संगीत मैफिलींचे आयोजन करीत असते. यासाठी अत्यंत माफक असे प्रवेश शुल्क आकारण्यात येते.

प्रथितयश गायकांच्या उत्तोमोत्तम दर्जेदार अशा अविस्मरणीय संगीत मैफिलींचे अभिजातने यशस्वी संयोजन केले आहे. साधारणत: तीन महिन्यांनी एका नवीन संगीत मैफिलीचे अभिजातच्या वतीने आयोजन करण्यात येते. कार्यक्रमांचे संयोजन व व्यवस्थापन अत्यंत नेटकेपणाने करण्यासाठी सर्व प्रकारची कामे अभिजात सदस्य उत्साहाने आणि जबाबदारीने विनामोबदला करतात.

गेल्या चार वर्षांत संस्थेने अनेक नामवंत कलाकारांचे शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाचे एकूण १४ कार्यक्रम यशस्वी करून संगीतरसिकांच्या मनात आपली सकारात्मक प्रतिमा निर्माण केली आहे. संस्थेने सादर केलेल्या कार्यक्रमांमध्ये सौ. पद्मजा फेणाणी-जोगळेकर, सौ. आरती अंकलीकर-टिकेकर, सौ. सावनी शेंडे, पं. आनंद भाटे, पं. शौनक अभिषेकी, पंडित विजय कोपरकर, पं. जयतीर्थ मेवुंडी, म. मुकुल शिवपुत्र, पं. कैवल्यकुमार गुरव, सौ. मंजुषा पाटील, सौ. सानिया पाटणकर, सौ. आशा खाडिलकर, सौ. सायली पानसे, श्री. दत्तप्रसाद रानडे इ. नामवंत कलाकारांचा समावेश आहे. परिणामत: अभिजातने आयोजित केलेल्या कार्यक्रमांना रसिकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला आहे. अभिजातद्वारा आयोजित संगीत मैफिलींना नियमितपणे हजेरी लावणारा एक निश्चित श्रोतृवर्ग तयार झाला आहे. आणि यामध्ये नियमितपणे उत्तोरोत्तर वाढच होत आहे. अभिजातच्या संगीतविषयक उपक्रमात सभासद, रसिक, श्रोता, कार्यकर्ता किंवा प्रायोजक म्हणून आपले 'सहर्ष' स्वागत आहे.

अभिजात संपर्कासाठी :-

श्रीराम आपटे (मो. : ९८६०७९६४५४),
अभय बापट (मो. : ९८६०७९६४५१)

आपल्या लातूर शाखेचे खातेदार श्री. कमलेश ठक्कर कानपूरच्या वन डे सामन्याचे सामना निरीक्षक

कानपूर येथे नुकताच भारत व दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना झाला. या सामन्याचे सामना निरीक्षक म्हणून आपल्या लातूर शाखेचे खातेदार व महाराष्ट्र क्रिकेट सामना असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष कमलेश ठक्कर यांची निवड करण्यात आली होती.

यापूर्वीही ग्वाल्हेर व इंदौर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट सामन्याचे सामनाधिकारी म्हणून कमलेश ठक्कर यांची निवड झाली होती. या निवडीबद्दल आपल्या बँकेतर्फे व क्रिकेट रसिकातर्फे हार्दिक अभिनंदन.

ई-बँकिंगमुळे बँकिग क्षेत्रात आमूलाग्र बदल शक्य : मा. श्री. देवळे

➤ **पान क्र. ६ वरून ...** प्रभुणे यांनी केले. संचालन प्रा. विशाल शर्मा व प्रा. डॉ. सारिका दायमा यांनी केले, तर आभार प्राचार्य डॉ. आत्माराम पळणीटकर यांनी मानले.

कॅश क्रेडिट खात्यांच्या मॉनिटरिंग विषयी काही महत्त्वाच्या बाबी

फिनान्शिअल पार्टनर या नात्याने खरेतर बँका ग्राहकांच्या व्यवसायाचा एक अविभाज्य भाग असतात. ग्राहक आपल्या व्यवसायाच्या खेळत्या भांडवलासाठी स्टॉक, डेटर्सच्या तारणावर बँकेकडून कॅश क्रेडिट मर्यादा घेत असतात. मानवी शरीरासाठी हृदयाचे कार्य व रक्ताभिसरणाचे जे महत्त्व आहे तेच महत्त्व ग्राहकाच्या व्यवसायासाठी खेळत्या भांडवलाचे आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. कारण शरीर तंदुरुस्त राहणेसाठी हृदयाचे कार्य व्यवस्थित व सुरळीत चालणे आवश्यक आहे. त्यासाठी रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या या उत्तम रीतीने रक्तवहन करणाऱ्या हव्यात. त्यामध्ये अडथळे निर्माण झाले की त्याचे स्वरूप व प्रमाणानुसार अँजियोप्लास्टी, बायपास सर्जरी करावी लागते व मग हृदयाचे काम सुरळीत सुरू होते. याचप्रमाणे खेळत्या भांडवलाच्या सुव्यवस्थित वहनामध्ये बाधा आणणाऱ्या अथवा अडथळे म्हणजेच ब्लॉकेज म्हणून सिद्ध होणाऱ्या खालील बाबींचा आपण गांभीर्याने विचार करावा.

१. व्यापारी येण्यांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त रक्कम जास्त जुनी राहणे.
२. आवश्यकता नसताना केवळ कंपनीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जास्त स्टॉक होल्डिंग करावे लागणे.
३. एखादी ऑर्डर रिजेक्ट होणे.
४. हजर स्टॉकमधील माल आऊट ऑफ फॅशनमुळे विकला न जाणे.
५. अचानकपणे माल खरेदीपोटी मिळणारे क्रेडिट बंद होणे व रोखीने खरेदी करावा लागणे.
६. खेळत्या भांडवलातील निधीचा वापर फिक्स्ड ॲसेट्सच्या खरेदीसाठी वापरणे.
७. एका व्यवसायातील निधी अन्य व्यवसायामध्ये वापरणे.

आता सांगितलेल्या बाबी या अडथळे निर्माण करतात. असे अडथळे दूर करणेसाठी, बँकेला रिझर्व्ह बँकेनी नेमून दिलेल्या तसेच बँकांच्या स्वतःच्या पतधोरणाच्या व नियमांच्या अधीन राहून मार्ग काढावा लागतो व यासाठी ग्राहकांच्या सहकार्याचीही आवश्यकता असते.

कॅश क्रेडिट खाते सुदृढ राहणे हे ग्राहकासाठी, व्यवसायाचे वृद्धीसाठी व बँकेसाठी नितांत गरजेची बाब आहे. खाते सुदृढ राहणे याचाच दुसरा अर्थ थकीत/ अनुत्पादक होऊ न देणे, याकरता काही गोष्टींची अत्यंत काटेकोर व चोख कार्यवाही आपल्याला करणे आवश्यक ठरते. प्रथम आपण खाते थकीत/ अनुत्पादक होणे म्हणजे काय हे जाणून घेऊ या.

१. आपल्या कॅश क्रेडिट खात्यावर सतत ३ महिने नावे पडलेल्या व्याजाच्या रकमेइतकी किमान रक्कम खात्यावर जमा झालेली नसेल म्हणजेच बँकेच्या दृष्टीने सदरचे व्याज थकीत म्हणून संबोधले जाते.
२. कॅश क्रेडिट खात्याची मुदत संपून ३ महिन्यांहून अधिक कालावधी होऊनदेखील खात्याचे नूतनीकरण न होणे.
३. सतत ३ महिने वा त्याहून अधिक कालावधीसाठी खात्यावरील नावेबाकी ही मंजूर मर्यादा वा ड्रॉइंग पॉवर पेक्षा अधिक राहिली असेल.

वरील ३ पैकी कोणत्याही एका कारणाची अपूर्तता जरी खाते दाखवत असेल तरी ते अनुत्पादक होते. खाते अनुत्पादक होणे म्हणजे खातेदाराच्या तसेच बँकेच्या दोघांच्याही दृष्टीने घातकच आहे. खातेदाराच्या दृष्टीने तोट्याचे कसे ते आपण पाहू यात.

१. खात्याला कायदेशीर वसुलीची कारवाई चालू होते. कर्जदार व जामीनदार अशा सर्वांना याला सामोरे जावे लागते.
२. कोणत्याही प्रकारची वाढीव कर्ज मागणी वा अन्य सवलतीची मागणी अशा खातेदारांसाठी बँक स्वीकारू शकत नाही.
३. एका बँकेकडे अनुत्पादक झालेल्या कर्जदारास अन्य बँकदेखील अर्थसहाय्य करू शकत नाही व खातेदार स्वतःची पत गमवून बसतो.

बँकेच्या दृष्टीने तोट्याचे कसे ते आता पाहू यात.

१. खाते अनुत्पादक झाल्यास त्या आर्थिक वर्षातील त्या कर्ज खात्यावर नावे टाकलेले पण वसूल न झालेले व्याज बँकेच्या नफ्यातून कमी करावे लागते.
२. खात्यावरील कर्जाच्या मुद्दल रकमेवर ठराविक प्रमाणात (१० टक्के, २० टक्के, ३० टक्के, ५० टक्के) बँकेच्या नफ्यातून तरतूद करावी लागते.
३. सदरची कर्ज रक्कम थकीत व पर्यायाने अडकून राहील्याने वापरामध्ये राहत नाही व त्यामुळे नवीन कर्ज वितरणासाठी बाधा निर्माण होते.
४. बँकेच्या नफातोटा क्षमतेवर याचा विपरीत परिणाम होतो.
५. अनुत्पादक खात्यांचे प्रमाण वाढल्यास रिझर्व्ह बँक तसेच जनमानसाप्रती बँकेच्या प्रतिमेस तडा जाऊ शकतो.

सर्व खाती सातत्याने परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून ठेवावयाची असतील, तर यासाठी ग्राहकांनी पुढील बाबींची सतर्कतेने पूर्तता करून बँकेस सहकार्य करणे आवश्यक ठरते.

१. कॅश क्रेडिट खात्यावर दरमहा किमान नावे पडलेल्या व्याजाइतकी रक्कम जमा झालीच पाहिजे.
२. कॅश क्रेडिट खात्याची मुदत संपण्याच्या तारखेपूर्वी १ महिना नूतनीकरणाचे प्रकरण आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह बँकेकडे सादर करणे.
३. उचलपात्र मर्यादा व मंजूर मर्यादेपेक्षा (यामध्ये जी कमी आहे त्यापेक्षा) सातत्याने ३ महिने वा त्याहून अधिक कालावधीसाठी खात्यावरील नावेबाकी जास्त राहणार नाही, याची दक्षता घेणे.
४. दरमहा १० तारखेपूर्वी आपल्या तारणाच्या म्हणजे स्टॉक/ डेटर्स/ क्रेडिटर्सच्या याद्या बँकेकडे विहित नमुन्यात सादर करणे.

या याद्यांमध्ये (अ) स्टॉक हा खरेदी किमतीने दाखविणे (ब) येणी ही ९० दिवसांचे आतील व ९० दिवसांपेक्षा जास्त अशी स्वतंत्रपणे दाखविणे अपेक्षित आहे.

५. व्यापाराचा सर्व व्यवहार बँकेमार्फतच करणे जेणेकरून खात्यावरील व्यवहार (टर्नओव्हर) बॅलन्सशीट व मंजूर मर्यादा यांच्याशी मिळताजुळता असेल.

वर लेखात नमूद केलेल्या बाबींची पूर्तता होत नसेल, तर खातेदारांशी संपर्क करून पूर्तता करून घेणे आवश्यक आहे.

श्री. उदय कुलकर्णी
कर्ज विभाग मुख्य कार्यालय

आनंदाची पाठशाळा : 'ओळखा स्वतःला घडवा स्वतःला'

मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे या आनंदाच्या पाठशाळेत स्वागत असो. मी आनंदाच्या पाठशाळेत असा उल्लेख केला, कारण आपण कुठल्याही परीक्षेच्या तयारीसाठी नाही, तर आयुष्यात यशस्वी होण्यासाठी जे आत्मसात करायचे व आचरणात आणण्याचा प्रयत्न करायचा आहे, त्याविषयी मी बोलतो आहे.

प्रथम आपण बघू या, करिअर म्हणजे नक्की काय? १२ वीचा निकाल लागल्यावर 'अमुकतमुक कोर्स कर, त्यात करिअरच्या उत्तम संधी आहेत' असे सल्ले दिले जातात. पेपरमध्ये अनेक करिअरविषयक जाहिराती असतात आणि प्रत्येक जाहिरात आकर्षक असते.

अनेक जाहिरातींमध्ये 'करिअरची उत्तम संधी, प्लेसमेंटची हमी' अशी अनेक आकर्षणे असतात. अशा जाहिराती मोहात पाडतात. पण कधी कधी बातमी येते की, कोर्स संपूनही नोकरी मिळाली नाही, म्हणून मुलांचे आंदोलन झाले, तर कधी काही संस्था कोणतीही मान्यता नसताना जाहिरात करत असतात, हे बातमीमुळे कळते. अर्थात असे अपवाद वगळता अनेकांना चांगले अनुभव पण आले आहेत. नोकरी मिळाली आहे.

'या पार्श्वभूमीवर आपण सर्वप्रथम करिअर या शब्दाचा अर्थ नीट समजून घेऊ.'

करिअर म्हणजे नक्की काय?

करिअर या शब्दाचा इंग्रजी शब्दकोषातील अर्थ अगदी साधा आहे. करिअर म्हणजे 'आपण नोकरी, व्यवसाय वगैरे जे काम करतो ते.' 'वे ऑफ लाईफ' किंवा 'वन्स लाईफटाईम वर्क' अशा अर्थाचा तो शब्द आहे.

रूढार्थाने या शब्दाचा संदर्भ आयुष्यामध्ये यशस्वी होणे असा बहुधा घेतला जातो. कुठेतरी याचा आर्थिक संदर्भही तुमच्या मनात असतो. उत्तम नोकरी, चांगला पगार, अधिकाराची जागा, प्रगतीची संधी, परदेशी जाण्याची संधी, एक ना अनेक गोष्टी आपण नकळत करिअर या शब्दाच्या अर्थाने घेतो. तेव्हा प्रथम आपण करिअर आणि यशस्वी करिअर यातील फरक समजून घेऊ.

आपण जेव्हा शिक्षण संपवून नोकरी किंवा व्यवसाय करायला लागतो तेव्हा दोन गोष्टी आपल्याबरोबर असतात. म्हणजे आपण घेतलेले शिक्षण आणि त्या अनुषंगाने आपल्याला प्राप्त झालेले कार्यकौशल्य.

याचे एक समर्पक उदाहरण पाहू या.

विनोदने बी.कॉम. करून बँकेच्या परीक्षा दिल्या आणि त्यातून त्याला एका राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी मिळाली व त्याच्या बँकेमधील करिअरची सुरुवात झाली. बँकेच्या नोकरीत विनोद निरनिराळ्या जबाबदाऱ्या पार पाडून आपल्या करिअरमध्ये मार्गक्रमण करू लागेल. या दरम्यान त्याचा अनुभव वाढेल. अनुभवाच्या आणि कार्यकौशल्याच्या जोरावर त्याला बढतीही मिळेल. पुढे त्याला आणखी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. दिलेली सर्व कामे नीट करत असताना फावल्या वेळात विनोदने आपले ज्ञान आणि कौशल्य काही कोर्सेस करून किंवा बँकेच्या अंतर्गत परीक्षा देऊन वाढवले, तर त्याला त्याच्या बँकेत आणखी महत्त्वाच्या जागी काम करण्याची संधी मिळेल. अशा प्रयत्नांना इंग्रजीमध्ये 'व्हॅल्यू ॲडिशन' (मूल्यवृद्धी) म्हणतात, विनोदने सतत स्वतःमध्ये मूल्यवृद्धी केली तर तो त्याच्या बँकिंग करिअरच्या आणखी वरच्या टप्प्यावर जात राहील आणि प्रयत्न आणि संधीची साथ असल्यास कदाचित वरिष्ठ अधिकारीसुद्धा होईल. असे घडल्यास 'विनोदने बँकेमध्ये यशस्वी करिअर' केले असे म्हणता येईल.

प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित 'ओळखा स्वतःला घडवा स्वतःला' या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.

हे सर्व करत असताना समजा त्याने वर्तमानपत्रामध्ये बँकिंग क्षेत्राबद्दल लेख लिहिण्यास सुरुवात केली. बँकिंग व्यवहार, गुंतवणूक सल्ला, आर्थिक तेजी-मंदी अशा विषयांना अभ्यासपूर्ण रीतीने हाताळले, तर लोक त्याला बँकींग आणि अर्थविषयक तज्ज्ञ म्हणून ओळखू लागतील. त्याला अनेक ठिकाणची व्याख्यानांची निमंत्रणे येतील. पुढे तो कदाचित या विषयावर काही पुस्तकेही लिहील, किंवा व्यवस्थापन कोर्सेस शिकवणाऱ्या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना शिकवेल आणि त्याचे करिअर आणखी बहरत जाईल. निवृत्त झाल्यानंतरही त्याला अनेक ठिकाणी सल्लागार म्हणून किंवा संचालक म्हणून काम करण्यासाठी निमंत्रणे येतील. असे जर झाले तर विनोदने त्याच्या **'करिअरची सर्वोच्च'** पातळी गाठली आहे असे निश्चित म्हणता येईल. याला इंग्रजीत 'सेल्फ ॲक्यच्युअलाझेशन' असे म्हणतात. त्याही पुढे जाऊन विनोदने त्याच्या अनुभवातून इतरांना प्रगती साधण्यासाठी मदत केली, सल्ला दिला, मार्गदर्शन (मेंटॉरिंग) केले तर त्याने त्याच्या **व्यक्तिमत्त्वाच्या प्रगतीची सर्वोच्च पातळी (ट्रान्सेडन्स)** गाठली असे म्हणता येईल. इथे 'करिअर'ची म्हणण्याऐवजी 'व्यक्तिमत्त्वा'ची असा शब्द मुद्दाम वापरला आहे, कारण अशी पातळी गाठणे थोड्याच लोकांना जमू शकते.

पण समजा याउलट जर विनोदने मिळालेल्या नोकरीमध्ये प्रामाणिकपणे दिलेले काम केले, पण आणखी जबाबदाऱ्या स्वीकारल्या नाहीत, बदली होईल या भीतीने बढती नाकारली, तर त्याची प्रगती एका मर्यादेपर्यंतच होईल. त्याची स्वतःची वेगळी ओळख त्याला त्याच्या क्षेत्रात निर्माण करता येणार नाही. नोकरी स्थिर असली तरी त्याचे यश एका मर्यादेतच असेल. नोकरी करत करत एके दिवशी तो निवृत्त होईल. त्याने संपूर्ण कार्यकाळात स्वतःची ओळख मर्यादित स्वरूपात ठेवली असल्याने त्याचे विश्वही मर्यादित राहील. नोकरीत असताना त्याने एखादा छंद किंवा आवड जपलेली नसेल किंवा एखाद्या सामाजिक कामात सहभाग घेतलेला नसेल, तर कदाचित वेळ कसा घालवावा, असा प्रश्न त्याच्यापुढे निर्माण होईल. अशा परिस्थितीमध्ये विनोदने बँकेमध्ये २५-३० वर्षे काम केले तरी त्याने यशाची शिखरे पादाक्रांत केली किंवा यशस्वी करिअर केले असे म्हणता येईल का? तुम्हीच ठरवा.

वर रंगवलेल्या दोन्ही प्रवृत्ती समाजात दिसतात. कोणी महत्त्वाकांक्षी असतो, तर कोणी आहे त्यामध्येच समाधानी राहतो, धाडस दाखवत नाही, स्वतःची ओळख निर्माण करू पाहत नाही.

यशस्वी करिअर आणि छंद/ ध्यास

माणसांच्या शोधात आणि अभ्यासात मला असे अनेक जण माहिती आहेत ज्यांनी आपली नोकरी/ व्यवसाय सांभाळून (तेथील जबाबदारी सांभाळून) दुसऱ्या एखाद्या क्षेत्रामध्ये आपला

ठसा उमटवला आहे. कोणी समाजकार्यात, तर कोणी पर्यावरण संवर्धनात, तर कोणी अनाथ अपंगांसाठी वा तळागाळातील लोकांसाठी काम केले आहे. कोणी फोटोग्राफी, चित्रकला, अभिनय, लेखन आदी कलात्मक क्षेत्रात कार्यरत आहेत, तर कोणी एखादा छंद उत्कटपणे जपला आहे.

काही उदाहरणे तुम्हाला आवर्जून सांगतो. ही उदाहरणे अशा व्यक्तींची आहेत की ज्यांनी आपला उद्योग, व्यवसाय केला आणि त्यात यशस्वी झाले.

पहिले उदाहरण तुम्हाला माझे सर आणि नंतर मी ज्यांचे सोबत कॉलेजात शिकवीत असे ते माझे ज्येष्ठ सहकारी कै. प्राध्यापक भालबा केळकरांचे देतो. ते सगळ्यांमध्ये 'भालबा केळकर' याच नावाने परिचित होते. खरे तर ते फिजिकल केमिस्ट्री शिकवायचे, पण महाराष्ट्र त्यांना ओळखतो ते प्रज्ञावंत दिग्दर्शक, आणि अभिनेते म्हणून, त्यांची 'पी.डी.ए.' ही संस्था प्रायोगिक नाटके करीत असे. अनेक उत्तम कलाकार या संस्थेने मराठी नाटक आणि सिनेमाला दिले. भालजींनी दिग्दर्शन आणि अभिनयाने सादर केलेले 'प्रेमा तुझा रंग कसा' हे नाटक आजच्या पिढीलाही आवडेल असे आहे. त्यांनी साकारलेली 'प्राध्यापक बल्लाळ' ही भूमिका अजरामर ठरली. भालबा केमिस्ट्रीचे प्राध्यापक असूनही सर्वांना दिग्दर्शक आणि अभिनेते म्हणून आजही स्मरणात आहेत.

दुसरे उदाहरण एका स्नेह्याचे देतो. हे माझे मित्र एका राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी करीत असत. बँकेतील नोकरी सांभाळून त्यांनी फोटोग्राफीचा छंद मनापासून जपला आणि वाढवला. आपल्या सर्व रजा ते फोटोग्राफी करण्यात व्यतीत करीत. नेचर फोटोग्राफी आणि पोर्ट्रेट फोटोग्राफी या दोन्ही प्रकारात त्यांची कला विस्तारली, प्रगत झाली. अनेक स्पर्धांमधून त्यांना पारितोषिकेही मिळाली.

तिसरे उदाहरण आणखी एका सहकारी प्राध्यापकांचे आहे. प्राध्यापक डॉ. नलावडे त्यांचा भूगोल हा विषय ते उत्तम शिकवतातच, पण त्यांची दुसरी ओळख आहे ती म्हणजे पक्षितज्ज्ञ म्हणून. अनेक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध वाचलेले आहेत.

आपण एक साधे उदाहरण पाहू- समजा आपण एखाद्या हॉटेलमध्ये गेलो आणि मेनू बघून ऑर्डर दिली, एक मसाला डोसा, दोन रवा डोसा, तर मागितलेले पदार्थ थोड्या वेळात वेटर समोर आणून ठेवतो. पण यशस्वी करिअर इतक्या सहजतेने फक्त ऑर्डर करून मिळत नाही. ते आपल्याला आपल्या प्रयत्नांनी मिळवावे लागते किंवा प्रयत्नपूर्वक घडवावे लागते. याचाच अर्थ **'यशस्वी करिअर आपोआप मिळत नाही.'** एखाद्या चांगल्या कोर्सला मिळालेला प्रवेश. ही प्राप्त झालेली एक संधी असते. स्वतःच्या प्रयत्नांनी या संधीचे सोने करणे गरजेचे आहे. अनेक जणांच्या हे लक्षात येत नाही. मी एम.बी.ए. करतोय किंवा मी डॉक्टर होतोय किंवा कॉम्प्युटर इंजिनिअर होतोय म्हणून मला उत्तम करिअर मिळेल, अशी स्वतःची समजूत करून घेतली जाते. शिक्षणाचे कोणतेही क्षेत्र असो, उत्तम करिअरसाठी, स्पर्धा असणार हे गृहीत सत्य विसरू नये. प्रयत्नपूर्वक स्पर्धात्मक व्हा, त्यासाठी प्रत्येक पातळीवर स्वतःच्या क्षमता जोखणे आवश्यक आहे. आपल्यामध्ये काही उणीव आहे असे लक्षात आले, तर त्यावर उपाय करणे म्हणजेच उणिवा दूर करण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. असे केले तर आत्मविश्वास नक्कीच वाढत जाईल आणि अशा स्थितीमध्ये तुमची उत्तरोत्तर प्रगती होतच जाईल.

कोणी एखाद्या क्षेत्रात खूप यशस्वी झाला म्हणून प्रत्येक जण तसाच यशस्वी होईल, असे मानणे धारिष्ट्याचे आहे. यशस्वी होणे हे शिक्षणाच्या जोडीने आपल्याला त्या विषयात असणारी आवड तसेच प्रत्येक टप्प्यावर मिळणाऱ्या संधीचा आपण कसा उपयोग करतो, यावर अवलंबून असते. थोडक्यात **कौशल्य, ध्यास आणि आव्हानात्मक संधीचा स्वीकार करण्याची हिंमत** (talent, passion and accepting challenging opportunity) या गोष्टी जपल्या तर यशस्वी करिअर करता येते.

आपण आणखी एक उदाहरण पाहू- मेधाचा वाढदिवस आहे म्हणून आईने तिला ड्रेस किंवा साडी घेण्यासाठी पैसे दिलेत. मेधा तिच्या मैत्रिणीबरोबर शॉपिंगला जाते. दोन-तीन दुकानात तिला काहीच पसंत पडत नाही. मग त्या दोघी जनरल विंडोशॉपिंग करत प्रत्येक दुकान पाहू लागतात. एका दुकानात शोकेसमध्ये लावलेला ड्रेस मेधाला आवडतो. दोघी मैत्रिणी मग त्या दुकानात शिरतात आणि शोकेसमधील ड्रेस दाखवा म्हणून सांगतात, मेधाला आवडलेला ड्रेस तिला दाखविण्यात येतो. आणखीही काही व्हरायटीज दाखवल्या जातात. मग त्यातले दोन-तीन ड्रेस शॉर्ट लिस्ट होतात. विक्रेता म्हणतो, ट्रायल बघा.

आवडेलला प्रत्येक ड्रेस घालून मेधा आरशात पाहते. मैत्रिणीला, 'मी या ड्रेसमध्ये कशी दिसते?' असे विचारते. शेवटी त्यातील एक ड्रेस घेण्याचे ठरविते. हजार-बाराशे रुपयांच्या ड्रेससाठी मेधा खूप चिकित्सा करून मग ड्रेसची निवड पक्की करते. घेतलेला ड्रेस फारफार तर वर्षभर चांगला टिकेल. मग एखादा कोर्स निवडताना किंवा जाहिरात वाचून एखाद्या कोर्सला प्रवेश घेताना मेधाने खरोखरच खूप विचार केला पाहिजे. कारण मेधा त्या ठिकाणी जे काही शिकेल ते तिला पुढे आयुष्यभर उपयोगी पडणारे असायला हवे.

म्हणजे जर मेधाला एखादा कोर्स करायचा असेल, तर तिने पुढीलप्रमाणे विचार करायला हवा :

- हा कोर्स आपल्याला झेपेल का?
- जी गोष्ट मी हा कोर्स करून शिकू पाहते आहे, ती मला खरच मनापासून आवडते का?
- अशा कोर्ससाठी आवश्यक गुण माझ्यात आहेत का? (गुण म्हणजे मार्क नाही.)
- कोर्स केल्यावर मला जी नोकरी मिळेल तिथे कोणत्या प्रकारचे काम असते?
- ते काम मला आवडेल का? जमेल का?
- या कोर्समधून जे कौशल्य मी शिकणार आहे त्याला बाजारामध्ये कायमस्वरूपी मागणी असेल का?
- कोर्सला आकारली जाणारी फी मला परवडेल का?
- त्या फीचा पुरेपूर मोबदला मला मिळेल का? (म्हणजेच इंग्रजीमध्ये ज्याला 'व्हॅल्यू फॉर मनी' म्हणतात. त्यादृष्टीने आपण विचार करतो का?)
- ज्या कॉलेजमध्ये आपण कोर्स करणार आहोत तेथे त्या कोर्ससाठी आवश्यक साधने आहेत का?
- तेथे तज्ज्ञ शिक्षक आहेत का?
- संस्थेला किती अनुभव आहे?
- मागील वर्षातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे का?
- अशी संधी मिळावी म्हणून ते कॉलेज/ संस्था काही विशेष प्रयत्न करते का?

बघा, निर्णय घेण्यासाठी विचारावयाच्या प्रश्नांची यादी तर वाढतच चालली.

कोणत्याही कोर्सची निवड करताना भावनांना महत्त्व न देता व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून विचार करायला हवा. मेधाची आई दुकानात नारळ विकत घेताना नारळ हलवून पाहते, चांगला वाटला तरच विकत घेण्याचा निर्णय घेते. नारळासारखी बारा-पंधरा रुपयांची वस्तू विकत घेताना आपण चाणाक्षपणे निर्णय घेतो, तर मग हजारो-लाखो रुपये भरून शिक्षणाचा निर्णय घेताना आपण गाफील राहून चालेल का?

क्रमशः

मा. वसंत कुलकर्णी : कर्तृत्वाचा अमीट ठसा

मा. वसंत शांताराम कुलकर्णी हे आपल्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून दि. ३०/०९/२०१५ अखेर निवृत्त झाले. ते पूर्वी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये कार्यरत होते. तेथे त्यांनी सर्व स्तरावरच्या शाखांमध्ये विविध पदांवर विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. जळगाव जवळच्या खेड्यामधून शालेय शिक्षणाची सुरुवात करून त्यांनी M.Com., LL.B., CAIIB अशी क्वालिफिकेशन्स मिळवली. शिक्षण व अनुभव यांची सांगड घालून त्यांनी आपल्या बँकेत नवीन पायंडे निर्माण केले. जरी त्यांचा अनुभव राष्ट्रीयीकृत बँकेतील असला तरी त्यांची सध्याच्या प्रश्नांशी योग्य सांगड घालून विविध प्रश्नांबाबत मार्ग काढला. शाखांसाठी नवीन शाखाधिकारी व नवीन शाखांसाठी शाखाधिकारी याबाबत काही यशस्वी प्रयोग केले. खेडब्रह्मा बँकेचे विलनीकरणाबाबत त्या बँकेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर वाटाघाटी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन सुविधा देणे, ऑडिट विषयक प्रश्नांची हाताळणी, बाहेरच्या संस्थामध्ये सेवक, अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत निव्वळ पुढाकार नव्हे, तर आग्रही भूमिका, सर्वच स्तरांवर/ श्रेणींमध्ये सेवकांची पदन्नोती, नवीन सेवकांच्या नेमणुका, सेवक संघटनेवर सौहार्दाचे संबंध, मुख्य म्हणजे १०,०००/- कोटींपेक्षा जास्तीचा व्यवसाय अशा त्यांच्या कार्यकालातील महत्त्वाचा घटना/ बाबीमध्ये त्यांनी त्यांचा ठसा उमटवला. त्यांनी कार्यभार स्वीकारला त्यावेळी दीर्घकालाच्या कठीण परिस्थितीचा सामना करीत आपण नुकतीच बँक नफ्यामध्ये आणली होती.

अशावेळी प्रगतीसाठी झेपावण्यासाठीची सारी पूर्वतयारी करावयाची होती. नवनवीन असंख्य आव्हाने समोर होती. त्यावेळी शांतपणे एक एक प्रश्न/ अडचणींची उकल करीत मार्गक्रमणा करणे आवश्यक होते ते त्यांनी साध्य केले. मा. कुलकर्णी साहेब बँकेशी संबंधितांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील, यात शंकाच नाही. त्यांना दीर्घ आयुरारोग्य लाभो, ही शुभेच्छा!

भारतीय रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची परिपत्रके

परिपत्रक क्र. आरबीआय/५८९/२०१५-१६ दि.७/०५/२०१५

विषय – कार्ड पेमेंट आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट व्यवहारासाठी सुरक्षा व जोखीम व्यवस्थापन

भारतीय रिझर्व्ह बँकेने कार्ड आणि इलेक्ट्रॉनिक पेमेंट व्यवहाराच्या सुरक्षा व जोखीम व्यवस्थापनासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना दि.२८/०२/२०१३ रोजी बँकांना केल्या होत्या.

कार्ड व्यवहाराच्या सुरक्षिततेसाठी बँकांनी ई.एम.व्ही. चीप तसेच पिनकार्डचा वापर करावा असा आग्रह रिझर्व्ह बँक गेले काही दिवसांपासून करीत आहे. अनेक बँकांनी या बदलाचा अवलंब केला आहे पण काही बँकांनी मॅग्नेटिक स्ट्राईप कार्डचा वापर चालू ठेवला आहे.

पॉईंट ऑफ सेल चे इन्फ्रास्ट्रक्चर सज्ज आहे. त्यामुळे मॅग्नेटिक स्ट्राईप कार्ड ऐवजी चीप व पिन कार्डच्या वापरासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

या परिपत्रकाद्वारे बँकांना सूचित करण्यात आले आहे की, त्यांनी दि.१/०९/२०१५ पासून नवीन डेबिट अथवा क्रेडिट, तसेच डोमेस्टिक अथवा आंतरराष्ट्रीय कार्ड देत असताना ई.एम.व्ही. चीप आणि पिन बेस्ट कार्डचाच वापर करावा.

सध्या वापरात असलेल्या मॅग्नेटिक स्ट्राईप कार्डांचे नवीन प्रकारच्या कार्डांमधील बदलाबद्दल सविस्तर सूचना भारतीय रिझर्व्ह बँक स्वतंत्रपणे जाहीर करील.

परिपत्रक क्र.आरबीआय/५९३/२०१५-१६ दि.१४/०५/२०१५

विषय – बँकांना वित्तीय मालमत्तेची विक्री – येणेबाकी पेक्षा अधिक रक्कम प्राप्त झाल्यास करावयाची उपाय योजना

सेक्युरिटायझेशनच्या कायद्या अंतर्गत विक्री केलेल्या वित्तीय मालमत्तेची किंमत बँकेच्या पुस्तकातील येणेबाकी रकमेपेक्षा अधिक प्राप्त झाल्यास ही रक्कम इतर व्यवहारात आलेल्या तोट्यासाठी वापरावी अशा सूचना भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांना दि.२८/०३/२०१४ रोजी केल्या होत्या.

भारतीय रिझर्व्ह बँकेने मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकांना ही रक्कम बँकेच्या नफा तोटा पत्रकाला वर्ग करण्याची परवानगी दिली आहे. त्यासाठी बँकांना ही रक्कम रोख स्वरूपात प्राप्त झालेली असणे आवश्यक आहे. सदर वाढीव तरतूद बँकांनी त्यांच्या व्हॉलंटरी डिसक्लोजरमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

परिपत्रक क्र.आरबीआय/६३३/२०१५-१६ दि.११/०६/२०१५

विषय – अल्प जोखीम ग्राहकांसाठी पत्त्यांचा पुरावा म्हणून घ्यावयाच्या दस्तऐवजाची नवीन यादी

अल्प जोखीम ग्राहकांना (लो रिस्क कस्टमर) बँकेत खाते उघडणे सुलभ व्हावे म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने पत्त्याचा पुरावा म्हणून घ्यावयाच्या दस्तऐवजामध्ये कांही कालावधीसाठी सवलत दिली आहे. नवीन सूचनांनुसार आत्ता खालील कागदपत्रे अल्प जोखीम ग्राहकांसाठी पत्त्याचा पुरावा ऑफिशियली व्हॅलीड डॉक्युमेंट (ओव्हीडी) समजण्यात येतील.

१. यूटिली बील – इलेक्ट्रिसिटी, टेलिफोन
२. प्रॉपर्टी टॅक्स, म्युनिसिपल टॅक्स पावती
३. बँक – पोस्ट ऑफिस खाते उतारा
४. पेन्शन – फॅमिली पेन्शन ऑर्डर
५. क्वार्टर्स अलॉटमेंट लेटर – केंद्र अथवा राज्य कार्यालयाचे
६. सरकारी कार्यालयाने केलेला पत्रव्यवहारावरील पत्ता ***

'चला गुजराती बोलू या' हे सदर यावेळी काही तांत्रिक कारणास्तव प्रसिद्ध करता आले नाही – क्षमस्व

शिक्षक दिनाच्या निमित्ताने मार्केटिंग विभागाने 'परमवीर चक्र विजेते' पुस्तकाची विद्यार्थ्यांना दिली भेट

देशाच्या सुरक्षिततेसाठी लष्कराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या सेवेकरिता जवान आपले संपूर्ण आयुष्य पणास लावून देशाच्या सीमांचे रक्षण करीत असतात. प्रसंगी अनेक जवान बलिदान देऊन शहीद होतात. अशा जवानांना त्यांच्या अतुलनीय पराक्रमासाठी अनेक पुरस्कार प्राप्त होत असतात. आपल्या देशात 'भारतरत्न' या सर्वोच्च पुरस्कारानंतर 'परमवीर चक्र' हा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार आहे. अशा जवानांच्या अमरकथा सांगणाऱ्या 'परवीर चक्र' पुस्तकाच्या प्रती विविध शाळांच्या ग्रंथालयाकरिता भेट देण्याचा अभिनव उपक्रम बँकेने केला आहे.

'परमवीर चक्र विजेते' हे पुस्तक प्रसिद्ध लेखक ब्रिगेडिअर अनिल तळवलकर (निवृत्त) यांनी लिहिले असून ते एकविरा पब्लिसिटी पुणे यांनी प्रकाशित केले आहे.

५ सप्टेंबर शिक्षकदिनाचे औचित्य साधून, बँकेच्या मार्केटिंग विभागाने या पुस्तकाच्या प्रती बँकेच्या शाखांशी संलग्न असणाऱ्या शाळा व शैक्षणिक संस्थाद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. बँकेच्या या स्तुत्य उपक्रमामध्ये अनेक संस्था, शाळांनी सहभाग घेऊन आभारपत्र पाठवून कौतुक केले.

शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन विद्यार्थ्यांना पुस्तकाची माहिती दिली व देशाच्या लष्कराचे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनासुद्धा पुस्तक वाचण्यासाठी उद्युक्त केले. तसेच विद्यार्थ्यांसमोर बचतीचे महत्त्व विशद करून बँकेच्या सुकुमार बचत ठेव चिरंजीव बचत ठेव, तसेच शुभाशिष योजनांची माहिती दिली व आपल्या बँकेत खाते उघडून बँकिंगविषयी व्यावहारिक ज्ञान मिळविण्याचे आवाहन केले.

सध्याच्या पिढीला देशाच्या वीर जवानांच्या कथांमधून नक्कीच स्फूर्ती मिळणार आहे. शाळांमधील विद्यार्थी हे देशाचे सुजाण नागरिक व बँकेचे भावी खातेदार आहेत. त्यांचे प्रबोधन करणे व त्यांना चैतन्यदायी साहित्य वाचावयास उपलब्ध करून देणे हाच या वर्षीच्या शिक्षकदिनाचा संकल्प होता. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी बँकेच्या संलग्न शाळा शिक्षण संस्थांनी तसेच मुख्याध्यापक व शिक्षक वर्गाने उत्तम प्रतिसाद दिला आहे. जनता बँक परिवारातर्फे सर्व गुरुजनांचे व शिक्षणसंस्थांचे मन:पूर्वक आभार...

पावस शाखेमध्ये वाहनकर्ज मेळावा

पावस शाखेतर्फे ग्राहकांकरता व वाहनकर्ज मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याचे उद्घाटन पावस गावामधील प्रसिद्ध उद्योगजक व स्वामी स्वरूपानंद मंदिराचे विश्वस्त मा. श्री. विजयशेठ देसाई यांचे हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी शाखेचे स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य प्रसिद्ध आंबा उद्योजक मा. सुहास शिंदे, श्री. विजय पावसकर, महाकाली पेट्रोल पंपाचे मालक सन्माननीय श्री. दत्तात्रय (नाना) नाना शिंदे, हॉटेल व्यवसायिक श्री. सुरेश पाथरे, खातेदार श्री. महादेव आखाडे व पूर्णगड-पावस सागरी महामार्ग पोलीस ठाण्याचे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री. प्रल्हाद पाटील हजर होते.

सुरुवातीला शाखेचे शाखाव्यवस्थापक मा. श्री. किशोर पावसकर यांनी सन्माननीय पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले व सदर वाहनकर्ज मेळावा आयोजित करण्यामागची संकल्पना स्पष्ट केली. त्यानंतर वाहनकर्ज व बँकेला अन्य कर्जाविषयीची माहिती शाखेचे मार्केटिंग प्रतिनिधी श्री. गिरीश काळे यांनी सविस्तर दिली.

या वाहनकर्ज मेळाव्याकरिता रत्नागिरी येथील जागृत मोटर्स यांचे सहकार्य लाभले होते. पावस पंचक्रोशीतील लोकांचा कर्ज मेळाव्याला चांगला प्रतिसाद होता.

माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०१५ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

श्री. नयन रमणलाल गांधी	कॅश सेल	कनिष्ठ अधिकारी
श्री. वसंत दगडु चोरघे	कर्वेनगर	लेखनिक
श्री. रमेश दत्तात्रय शिंदे	बाजीराव रोड	लेखनिक
श्री. काशिनाथ पांडुरंग शिंदे	सीआयसीडी	शिपाई

वाचकांना नम्र आवाहन

गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा.

पत्ता : श्री. जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे., मो. क्र. : ९९७०८००३४८

गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. * ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)

२८/१०/२०१५